
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष अठरावे / अंक ९ / सप्टेंबर २०१७

## संपादकीय

### लूटमार, वसाहतवादी (स्वातंत्र्यपूर्व), आणि लोकशाहीवादी (स्वातंत्र्यानंतर)

जुलै २०१५ ला श्री. शशी थरूर यांनी ऑक्सफर्डमधील ऑक्सफर्ड युनियन सोसायटीच्या एका चर्चासत्रामध्ये केलेल्या भाषणाने सगळी माध्यमं ढवळून निघाली. देशातील आणि परदेशातील सगळ्या वृत्तपत्रांनीही त्यांच्या भाषणाची दखल घेतली. ब्रिटिश साम्राज्यवादाचे फायदे, आणि तोटे याविषयाशी निगडित असलेल्या या चर्चासत्रामध्ये शशी थरूर यांनी भारताचे उदाहरण घेऊन या साम्राज्यवादाचे वाभाडे काढले.

आपल्या १६ मिनिटांच्या भाषणामध्ये त्यांनी अनेक उदाहरणे देऊन साम्राज्यवादामुळे भारताच्या झालेल्या दुर्दशेचे चित्र उभे केले. १६०० साली व्यापाराकरता म्हणून 'इस्ट इंडिया कंपनी' भारतात आली. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. १६०० साली जागतिक व्यापार, आणि त्याच्या अनुषंगाने असलेल्या अर्थव्यवहारामध्ये भारताचा हिस्सा २३% होता. १९४७ साली जेंव्हा इंग्रज आपला देश सोडून गेले, त्यावेळी भारताचा हिस्सा ४% हून खाली आला. या उदाहरणांनी शशी थरूर यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली होती. भारतामधील भरभराटीच्या कापड उद्योगाला आलेली अधोगती, आणि दुष्काळांची उदाहरणे देऊन, याकरता ब्रिटिशांची धोरणे कशी जबाबदार होती हेही त्यांनी दाखवून दिले.

८ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत भारत हा मोगलांच्या साम्राज्यवादाविरुद्ध लढतच होता. या आक्रमकांचा जुलूम आणि लुटारूपणामुळे कला, उत्पादकता आणि व्यापार व्यवस्था विस्कळीत होत गेली. भारताची वैशिष्ट्यपूर्ण समाजव्यवस्था अस्थिर होऊन, सर्व क्षेत्रामधील नेतृत्व कमकुवत व्हायला लागले. शुद्ध अस्तित्वाकरता लढाया चालू झाल्या. तत्त्वतः इंग्रजांनी भारताची सत्ता ही मोगलांकडूनच घेतली. सत्ता याचा अर्थ नुसती सैनिकी हुकुमशाही इतकाच मर्यादित नसतो. समाजाचे अर्थकारण हे त्या समाजाच्या स्थैर्याशी निगडित असते. असा स्थीर समाजच नुसत्या वस्तुंचेच उत्पादन आणि व्यापार नाही तर, साहित्यापासून, कलेपर्यंत सगळ्याच क्षेत्रामध्ये विकास पावत असतो.

अखंड भारतामध्ये ९ व्या, १०व्या शतकापासून मध्यआशिया मधील टोळीवाल्यांचे हल्ले चालू झाले. तेथूनच भारताच्या समाजव्यवस्थेला आणि व्यापाराला उतरती कळा लागू लागली. (पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

८६ वर्षापूर्वी इंग्लंडमध्येच ऑक्टोबर १९३१ ला लंडनच्या चॅथम हाऊसमध्ये (Chatham House) महात्मा गांधी यांनी असेच एक भाषण दिले होते. या भाषणामध्ये गांधीजींनी, ब्रिटिशांच्या धोरणांमुळे भारताची परंपरागत शिक्षणपद्धती उद्ध्वस्त झाली, असे विधान केले. ब्रिटिशांमुळे भारत सुशिक्षित झाला, सुसंस्कृत झाला या धर्मप्रसारक आणि ब्रिटिश सरकारच्या प्रचाराला छेद देणारे ते भाषण होते. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर,


"I say without fear of my figures being challenged successfully, that today India is more illiterate than it was fifty or a hundred years ago, and so in Burma, because the British administators, when they came to India, instead of taking hold of things as they were, began to root them out. They scratched the soil and began to look at the root, and left the root like that, and the beautiful tree perished."

गांधीजींच्या या भाषणाला इंग्लंडमधील बरेच उच्चभ्रू हजर होते. इंग्रजांच्या भारतातील कारभारामुळे, भारतासारख्या एका प्राचीन संस्कृती असलेल्या देशाचे दिवाळे वाजत असल्याची माहिती, इंग्लंडमधील काही उदारमतवादी, आणि भारतात काम केलेले काही अधिकारी लिहित होते. शिक्षणाच्या संदर्भातील गांधीजींच्या या विधानांनी चांगलीच खळबळ माजवून दिली. एकेकाळचे डाक्का विद्यापीठाचे उपकुलगुरु सर फिलिप्स हारटॉग (Sir Philip Hartog) हे या भाषणाला उपस्थित होते. मॅकॉलेच्या शिक्षणपद्धतीचे ते पुरस्कर्तेच होते. त्यांनी गांधीजींना त्यांच्या या विधानाबद्दल, 'एकतर साधार पटवून द्या, नाहीतर माघार घेऊन माफी मागा', असे आव्हान केले. गांधीजींचा सगळा वेळ हा स्वातंत्र्य चळवळीत जात असल्यामुळे त्यांनी त्यांचे सहकारी दौलतराम गुप्ता आणि के. टी. शहा यांच्यावर हे काम सोपवले. मॅकॉलेपूर्व भारतातील शिक्षणपद्धतीचा अभ्यास अनेक धर्मप्रसारक, आणि सरकारी अधिकाऱ्यांनी तपशीलवार लिहुन ठेवला होता. या माहितीवर आधारित या दोघांनीही अनेक लेख लिहून गांधीजींच्या विधानाला असलेले आधार सादर केले. अर्थातच हारटॉग यांचे समाधान होणे शक्य नव्हते. लंडन विद्यापीठाच्या Institute of Education मध्ये इंग्रजांची बाजू तीन भाषणे देऊन त्यांनी मांडली. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसनी (OUP) १९३९ साली 'Some Aspects of Indian Education Past and Present' या शीर्षकाखाली ती प्रकाशित केली. दुर्दैवानी, भारत हा साक्षरच नाही तर सुसंस्कृत होता, खेड्यापाड्यांमधून जनतेला शिक्षण मिळत होते, या विषयी पुरेशी जागृती आजही आपल्या समाजामध्ये नाही. १९८३ साली श्री. धरपाल यांनी इंग्रजानीच लिहिलेल्या सगळ्या तपशीलांचे संकलन करून, 'The Beautiful Tree' हे पुस्तक लिहिले आहे. इतिहास किंवा संस्कृतीच्या अभ्यासकांनीच नाही तर प्रत्येक भारतीयांनी हे पुस्तक वाचणे आज आवश्यक आहे.

बरोबर १५० वर्षांपूर्वी म्हणजे २ मे १८६७ ला दादाभाई नौरोजींनी लंडन येथील East Indian Association यांनी आयोजित केलेल्या सभेमध्ये England's Duties to Indian या शीर्षकाखाली एक भाषण केले. आपल्या भाषणात दादाभाई म्हणतात,

"More than 20 year earlier a small band of Hindu Students and thoughtful gentlemen used to meet secretly to discuss the effects of British rule upon India. The home charges and the transfer of capital from India to England in various shapes, and the exclusion of the children of the country from any share or voice in the administration of their own country, formed the chief burden of their complaint."

(पृष्ठ क्र. ३९ वर)



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष अठरावे/अंक ९/सप्टेंबर २०१७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक ३ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | शांघाय संग्रहालय | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | शास्त्रवेध-५ : प्रारणे व अणूची संरचना | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : ६) | श्री. अरविंद ओक | १२ |
| ५) | ओळख वनस्पतींची<br>करवंदे, एक अनोखा रानमेवा | श्री. प्रकाश दुधाळकर | १५ |
| ६) | व्यथा बलुचिस्तानची | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १७ |
| ७) | लंडनचा प्रवास | प्रतिक्षा राजाध्यक्ष | ३० |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# शांघाय संग्रहालय

*शांघाय हे चीनेच औद्योगिक दृष्टीने प्रगत असे शहर आहे. या शहरात अनेक दुर्मिळ वस्तूंनी युक्त असे संग्रहालय आहे.या संग्रहालयाला प्रत्यक्ष भेट देऊन हा लेख लिहिलेला आहे - संपादक*

शांघायचे कला दालन, विज्ञान तंत्रज्ञान संग्रहालय यांची माहिती आपण या आधीच्या दिशा मासिकाच्या अंकात वाचली. शांघाय शहरातील आणखी एक महत्त्वाचे ठिकाण म्हणजे शांघाय संग्रहालय होय. २००४ मध्ये युनेस्कोने या शहरात एक कृतिसत्र आयोजित केले होते. त्या कृतीसत्रात सहभागी होण्यासाठी मी तेरा वर्षांपूर्वी प्रथमच शांघायला गेलो होतो. तेव्हा आयोजकांनी आम्हाला हे संग्रहालय दाखविले होते. त्यानंतर आणखी काही कामानिमित्ताने दोन-तीन वेळा या शहराला भेट देण्याचा योग आला. अलीकडची शांघाय भेट ही २०१६ सालची. किशोरवयीन मुलांसाठी असलेली ३१ वी नवनिर्मिती स्पर्धा (कास्टिक) याच शहरात ऑगस्ट महिन्यात भरली होती. त्यात सहभागी होण्यासाठी मी जेव्हा शांघायला गेलो तेव्हा देखील या संग्रहालयाला भेट देण्याचा योग आला. प्रस्तुत लेख याच भेटीवर आधारलेला आहे.

शांघाय शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पिपल्स स्केअर आहे. या परिसरात शहरातल्या अनेक उंच उंच इमारती आहेत. त्यामध्ये फारशी उंच नसलेली तरिही लक्ष वेधून घेणारी ही इमारत आहे. आजूबाजूचा बराच परिसर मोकळा असल्याने या संग्रहालयाची इमारत आपल्याला दुरुनच दिसते. जसे जवळ जावे तसे इमारतीच्या बांधकामातील वैशिष्ट्ये आपल्या नजरेत येतात. ही संपूर्ण इमारत लालसर दगडांनी बांधली असून तिचा आकार जरा विचित्रच आहे. इमारतीचा खालचा भाग चौकोनी असून वरचा भाग मात्र गोलाकार आहे. पृथ्वी चौकोनी असून आकाश गोलाकार आहे अशी प्राचीन काळातील चिनी लोकांची समजूत होती. त्याच समजूतीचे प्रतिबिंब या इमारतीच्या रचनेत दिसते. वरून पाहिल्यास ही इमारत जुन्या काळात वापरल्या जाणाऱ्या ब्रांझच्या भांड्यासारखे दिसते. अशा आकाराचे भांडे प्राचीन काळात स्वयंपाक करण्यासाठी वापरत असत. त्याला त्यांच्या भाषेत डींग असे म्हणतात.



**संग्रहालयाची सुबक इमारत**

या इमारतीच्या रचनाकाराचे नाव शिंग टोंघे (Xing Tonghe) असे होते अशी माहिती आम्हाला मिळाली. या इमारतीचे बांधकाम १९९३ मध्ये सुरू झाले आणि ते पूर्ण व्हायला तीन वर्षांचा कालावधी लागला. हे कार्य पूर्णत्वाला नेण्याच्या कामात मा चेंग्‌उअन (Ma Chengyuan) यांनी मोलाची कामगिरी बजावली. १९८५ ते १९९९ या दीर्घ कालावधीसाठी ते या संग्रहालयाचे संचालक होते. इथे आणण्यापूर्वी हा सम्पूर्ण संग्रह शहरात एका वेगळ्याच ठिकाणी होता. ती जागा वाढत्या संग्रहाला अपुरी पडत होती. म्हणून त्यांनी नवीन इमारत बांधून घेण्याचा चंग बांधला. प्रथम अशा इमारतीची निकड त्यांनी राज्यकर्त्यांना पटवून दिली.

एव्हढेच नव्हे तर बांधकामासाठी लगणारा निधी मिळविण्यासाठी देखील त्यांनी पायपीट केली. त्यांच्या अथक परिश्रमाचे यश म्हणून ही इमारत आता शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी दिमाखात उभी आहे. १९९६ मध्ये जुन्या अपुऱ्या जागेत असलेला सगळा संग्रह या प्रशस्त अशा जागेत आणण्यात आला. खरे तर हे संग्रहालय म्हणजे शांघाय शहराची शान आहे असेच म्हणावे लागते.



**संग्रहालयाचे जवळून दर्शन**

हे संग्रहालय पाच मजल्यांवर विखुरले आहे. आपल्याकडे तळमजल्याला ० या अंकाने संबोधले जाते. चीनमध्ये मात्र तळमजला हा १ या अंकाने दर्शविला जातो. त्या हिशेबाने या संग्रहालयात १ ते ५ मजले आहेत. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी उद्वाहन तर आहेच त्याचबरोबर सरकते जिने देखील बसविले आहेत. त्यामुळे एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाणे सहज शक्य होते. या संग्रहालयातील काही जागा गरज पडेल त्याप्रमाणे वापरण्यासाठी ठेवलेली आहे. तेथे वेगेवेगळ्या विषयांवरची अस्थायी स्वरूपाची प्रदर्शने भरविली जातात. दहा दालने मात्र स्थायी स्वरूपाची आहेत. प्रत्येक दालनात एके विषयाशी संबधित वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे प्रदर्शन पाहणाऱ्याला सोयीचे होते. त्या दहा दालनातील मुख्य विषय पुढे दिलेले आहेत.

१. जुन्या ब्रॉन्झच्या वस्तू
२. जुन्या काळातील मूर्ती
३. चिनी मातीची भांडी
४. जेड पासून बनविलेल्या वस्तू
५. जुन्या काळातील चित्रे
६. कॅलिग्रॅफीची छायाचित्रे
७. चिनी बनावटीचे शिक्के
८. नाण्यांचा संग्रह
९. जुने फर्निचर
१०. आदिवासी कला

विशेष म्हणजे प्रत्येक दालनाच्या प्रवेशद्वारावर त्यातील वस्तूबद्दल माहिती स्पष्टपणे दिसेल अशी पाटी लावली आहे. प्रत्येक मजल्यावर एका दालनातून दुसऱ्या दालनात सहज जाता येईल अशी व्यवस्था आहे. वरच्या मजल्यावरून खाली नजर टाकली तर एक मनोहारी दृश्य आपल्याला दिसते.



**तळमजल्याचे मनोहारी दृश्य**

संग्रहालय पाहणे मला आवडते. त्यासाठी होणारी पायपिट करण्याची माझी तयारी असते. शांघाय संग्रहालयात देखील मी हेच केले. सगळी दालने मी पालथी घातली. सगळ्या वस्तू पद्धतशीर लावलेल्या असून सर्वत्र स्वच्छता आहे. प्रत्येक लहानसहान वस्तूवर


पुरेसा प्रकाश पडेल अशी दिव्यांची व्यवस्था केलेली आहे. माझ्याकडे वेळ मर्यादित असल्याने प्रत्येक दालनात मला पुरेसा वेळ देता आला नाही. तरीही महत्त्वाच्या वस्तूंची छायाचित्रे घ्यायला मी विसरलो नाही. त्यातील काही निवडक छायचित्रे मी खाली देत आहे.



**जुनी नाणी**



**दगडात कोलेल्या मूर्त्या**



**जेडच्या कोरीव वस्तू**



**धातूमधील बारीक कलाकुसर**



**चिनीमातीच्या वस्तू**



**चित्रकलेचा एक नमूना**



जुने फर्निचर



आदिवासी क्लाकृती



धातूमधील नक्षीकाम

संग्रहालय ही संकृतीची ओळख असते. त्यातून त्या देशातील लोकांचा भूतकाळ, त्यांच्या चालिरिती, सामाजिक रूढी या सगळ्या गोष्टींची माहिती मिळते. पाश्चिमात्य देशात प्रत्येक शहरात आपल्याला संग्रहालय पाहायला मिळते. त्याच धर्तीवर चीनने देखील हे संग्रहालय उभारलेले आहे. यात एका लाखाहून जास्त वस्तू आहेत. त्या वस्तू अनेक मार्गांनी मिळविलेल्या आहेत. त्यातील काही वस्तू उत्खननात सापडल्या आहेत. अशा वस्तूंची संख्या अर्थातच मर्यादित आहे. काही वस्तू विकत घेतल्या आहेत. परंतु बऱ्याच वस्तू लोकांच्या संग्रहातून मिळविलेल्या आहेत. त्यातील काहींनी त्या संग्रहालयाला स्वेच्छेने दिलल्या आहेत तर काही वस्तू जबरदस्तीने घेण्यात आलेल्या आहेत, असे आमच्या मार्गदर्शकाने आम्हाला सांगितले. काहीका असेना त्या सगळ्या वस्तू एकत्रपणे आणि पद्धतशीर या संग्रहालयात लावून ठेवण्यात आलेल्या आहेत. हा देशाचा ठेवा आहे. अशा संग्रहालयातूनच पर्यटकांना त्या देशाची ओळख होते. म्हणून संग्रहालयाचे एवढे महत्त्व आहे. आपल्याकडे मात्र जुन्या वस्तू जपून ठेवण्यावद्दल जरा अनास्थाच आढळते. त्याचबरोबर जर कुठे जुन्या वस्तूंचा संग्रह असेलच तर तो पाहायला जाणाऱ्यांची संख्याही मर्यादितच असते. हे चित्र बदलणे आवश्यक आहे.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

•••

नीच कृत्ये करणाऱ्यांच्या पाठोपाठ सूड हा आपोआपच येत असतो. - टी. फुलर


# शास्त्रवेध- ५ : प्रारणे व अणूची संरचना

*अस्थिर असलेली अणुकेंद्रके, किरणोत्सारी ऱ्हासाच्या प्रक्रियेत, किरणोत्सर्जन करून स्थीर होतात. किरणांची ही उत्सर्जने म्हणजेच प्रारणे. याविषयी माहिती विशद करणारा लेख - संपादक*

## प्रारणे म्हणजे किरणे

प्रारणे म्हणजे किरणे. मग ती जम्बुपार (अल्ट्रा-व्हायोलेट) किरणे असोत, दृश्य प्रकाशाची असोत अथवा अवरक्त (इन्फ्रारेड, उष्णतेची) असोत. ह्या सगळ्या किरणांशी तर आपण चिरपरिचित आहोतच. ह्या किरणांत असते वस्तूच्या रंग-रूपा-बाबतची माहिती आणि हो, सोबतच असते प्रखर ऊर्जा. ह्या सगळ्यांचे स्वरूप असते विद्युत-चुंबकीय लहरींचे. स्रोत, बहुधा असतो सूर्य. अर्थातच चंद्र, तारे व अन्य अवकाशीय वस्तूही आपल्याला प्रारणे पाठवतच असतात. हल्ली आपण वैद्यकीय उपयोगांमुळे, क्ष-किरणांनाही चांगलेच ओळखतो. ती तर आणखीनच प्रखर असतात. मनुष्यदेहात केवळ हाडांनीच अडतात.


विद्युत चुंबकीय लहरी




अभिजात भौतिकीचे नियम जिथे अपुरे पडू लागले तिथे पुंज सिद्धांताने कोडी सोडवली. ह्या सिद्धांतानुसार, प्रकाश विद्युतचुंबकीय तरंगांनी बनलेल्या पाकिटांच्या रूपात प्रवास करतो. त्या पाकिटांना पुंज म्हणतात. मूळ तरंग-कंप्रतेवर त्यातील ऊर्जा निश्चित होते. ज्या पदार्थांवर असे पुंज आपाती असतात, त्या पदार्थांत ते आपली ऊर्जा रीती करून नामशेष होतात.

जम्बुपार (अल्ट्रा-व्हायोलेट) किरणांत ही ऊर्जा जास्त असते. म्हणून अशी किरणे मानवी शरीरास अपायकारकही मानली जातात. दृश्य प्रकाशाची किरणे ज्या वस्तुपासून आपल्या डोळ्यांत शिरतात त्या वस्तूच्या रंगाबाबतची माहिती, ते त्यातील ऊर्जेच्या रूपाने नेत्र-मज्जेत रीती करून नामशेष होतात. म्हणूनच, आपल्याला वस्तू आहेत तशा दिसू शकतात. अवरक्त (इन्फ्रारेड, उष्णतेची) किरणांत तुलनेने कमी ऊर्जा असते. मात्र जी ऊर्जा ते पदार्थात रीती करतात त्याने त्या वस्तू तापतात. किरणे मात्र नावालाही शिल्लक राहत नाहीत.

विद्युत चुंबकीय वर्णपट




## क्ष-किरणे

क्ष-किरणे ह्या सगळ्यांच्या मानाने खूपच ऊर्जस्वल असतात. ती मनुष्यदेहात मांसातून आरपार जाऊ शकतात व केवळ हाडांनीच अडतात. हाडांत ती शोषली गेल्यावर

त्यातील ऊर्जा अस्थिपेशींचे नुकसानही घडवत असतेच. आपण खरे तर अशा सर्व संसर्गांची व्यवस्थित नोंद ठेवायला हवी.

क्ष-किरणांचा शोध विल्हेल्म कॉनराड रॉंजन (२७ मार्च १८४५ ते १० फेब्रुवारी १९२३) ह्यांनी १८९५ मध्ये लावला. ते जर्मन भौतिकशास्त्रज्ञ होते. त्यांनी क्ष-किरण पट्ट्यातील विद्युत चुंबकीय प्रारणे निर्माण करून त्यांचे संवेदन साध्य केले. त्याखातर त्यांना १९०१ साली भौतिकशास्त्रातले पहिले नोबेल पारितोषिक मिळाले. हवेतील किरणोत्साराच्या प्रभावाचे मापन करणाऱ्या एककास, रॉंजन यांच्या सन्मानार्थ त्यांचेच नावही देण्यात आलेले आहे.




**विल्हेल्म कॉनराड रॉंजन**
**(२७ मार्च १८४५ ते १० फेब्रुवारी १९२३)**

शोधानंतर ५० दिवसांनी म्हणजेच २८ डिसेंबर १८९५ रोजी, भएका नव्या प्रकारच्या किरणांबाबत* हा त्यांचा शोधनिबंध प्रसिद्ध झाला. वयाच्या ७८ व्या वर्षी ते आतड्याच्या कर्करोगाने वारले. मात्र क्ष-किरणांवर थोडा काळच काम केल्याने व ते नियमितपणे शिशाची ढाल वापरत असल्याने त्यांच्या कर्करोगाचे कारण त्यांचा क्ष-किरणांवरचा अभ्यास असावा असे मानले जात नाही. नोव्हेंबर २००४ मध्ये त्यांच्या कामाच्या सन्मानार्थ अण्वांक १११ या मूलद्रव्यास इंटरनॅशनल युनियन ऑफ प्युअर अँड अप्लाईड केमिस्ट्रीतर्फे रॉंजनियम (Rg) हे नाव देण्यात आले.

**वस्तुमानात्मक किरणे**

पुढे, अंधारात ठेवलेल्या चित्रक-पट्ट्या (फोटोग्राफिक प्लेटस), कुठल्याशा पदार्थाच्या केवळ सान्निध्यानेच विकसित झाल्या आहेत असे आढळून आले. मग त्या पदार्थातूनच त्यांना ऊर्जा मिळत असावी असा कयास केला गेला. त्याबाबत पुरावे मिळवण्याचे प्रयत्न झाले. मग तो पदार्थही ओळखला गेला आणि त्यातील उत्सर्जनही लक्षात आले. मात्र हे उत्सर्जन केवळ विद्युत-चुंबकीय-लहरींच्या स्वरूपात नव्हते, तर त्याव्यतिरिक्त त्यासोबत कणात्मक पदार्थही उत्सर्जित होत असल्याचे दिसून आले. त्या उत्सर्जनांना वस्तुमान होते. ही प्रारणे नवीनच होती. हे त्यांचे स्वरूप नवीनच होते. त्यात ऊर्जा तर होतीच. ते होते गॅमा किरण. शिवाय त्यात वस्तुमानही उत्सर्जित होत होते. ती होती अल्फा आणि बीटा किरणे.

**किरणोत्सर्जनाचा शोध**




**अँटोनी हेन्री बेक्केरल**
**(१५ डिसेंबर १८५२ ते २५ ऑगस्ट १९०८)**

सन १८९६ मधे हेन्री बेक्केरल नावाच्या एका फ्रेंच भौतिक शास्त्रज्ञाला युरेनियम क्षारातील किरणोत्साराचा शोध लागला. ते एक नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ होते. उत्स्फूर्त किरणोत्साराचा शोध लावल्याखातर त्यांना मेरी क्युरी आणि पिअरे क्युरी यांचेसोबत १९०३ मध्ये नोबेल पारितोषिक दिले गेले. ह्या किरणोत्साराचा प्रभाव त्याला एका वापरल्या न गेलेल्या फोटोग्राफिक फिल्मवर आढळून आला. नंतर सन् १८९७ मध्ये मेरी क्युरी आणि तिचे पती पियरे क्युरी यांनी पोलोनियम व रेडियम ह्या दोन किरणोत्सारी पदार्थांना वेगळे करण्यात यश मिळवले. ह्या किरणोत्सारी पदार्थांपासून उत्सर्जित किरणांची ओळख अल्फा, बीटा, गॅमा ह्या नावांनी पटवली गेली.



**मेरी क्युरी**
**(जन्मः ७ नोव्हें. १८६७, वॉर्सा, पोलंड**
**मृत्यूः ४ जुलै १९३४, सॅव्हॉय, फ्रान्स)**

१८९१ मध्ये सॉर्बोन्न येथे भौतिक आणि गणितीय विज्ञानांतील लायसेन्शियेटशिप मिळाल्याने क्युरी पुढील शिक्षणाकरता फ्रान्समध्ये गेल्या. १८९४ मध्ये त्यांची स्कूल ऑफ फिजिक्समधील प्रोफेसर पिअरे क्युरी यांचेशी गाठ पडली. १८९५ मध्ये त्यांचे लग्न झाले. मिळालेल्या अनेक पारितोषिकांद्वारेच मादाम क्युरींच्या कामाचे महत्त्व ध्यानात येते. त्यांना अनेक विज्ञान, वैद्यक आणि कायदा या विषयांतील सन्माननीय पदव्या प्राप्त झालेल्या होत्या. जगभरातील अनेक ज्ञानवंत समाजांची सदस्यताही त्यांना मिळालेली होती. बेक्केरल यांनी शोधून काढलेल्या उत्स्फूर्त किरणोत्साराच्या अभ्यासाकरता, त्यांना पतीसोबत १९०३ सालचे नोबेल पारितोषिक मिळालेले होते. ह्या पारितोषिकाचे अर्धे मानकरी बेक्केरल हेही होते. १९११ मध्ये त्यांना किरणोत्सारातील त्यांच्या कामाकरता रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळालेले होते. अमेरिकेतील स्त्रियांच्यावतीने, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हार्डिंग यांनी त्यांना १९२१ मध्ये त्यांच्या विज्ञानसेवेकरता १ ग्रॅम रेडियम भेट दिले होते. त्यांच्या कामाच्या गौरवार्थ किरणोत्साराच्या एककास त्यांचे नाव दिले गेले. १ ग्रॅम रेडियमपासून दर सेकंदास प्राप्त होणाऱ्या किरणोत्सारास ‘१ क्युरी’ असे संबोधले जाऊ लागले.




पुढे असे लक्षात आले की ह्या अल्फा, बीटा आणि गॅमा किरणांचा उगम अणूच्या संरचनेत होत असतो. पण कसा? ते जाणून घेण्याकरता आधी अणूची संरचना कशी असते ते जाणून घ्यायला लागेल. एक मध्यवर्ती अणुकेंद्रक आणि त्याभोवती दूरवर फिरत राहणारे, पदार्थास ऋण करणारे कण यांनी मिळून अणू घडलेला असतो.

**अणूची संरचना**

अल्फा आणि बीटा किरणांत पदार्थाचे कण आढळून आलेले होते. सर्व पदार्थ मूलद्रव्यांपासून बनलेले

असतात. मूलद्रव्यांची काही उदाहरणे म्हणजे उद्जन वायू (हायड्रोजन), प्राणवायू (ऑक्सिजन), कर्ब (कार्बन) व सोने (गोल्ड) ही आहेत. अणू हा मूलद्रव्याचा सर्वात छोटा कण असतो. प्रत्येक मूलद्रव्याच्या अणुमधे त्या मूलद्रव्याचे सर्व विशिष्ट गुण सामावलेले असतात. त्याचा आकार एक अब्जांश मीटरहूनही लहान असतो. जशी एखादी भिंत दगड किंवा विटांपासून बनवलेली असते त्याचप्रमाणे प्रत्येक पदार्थ हा अब्जावधी अणूंपासून बनलेला असतो. सर्व सजीव आणि निर्जीव वस्तू कोणत्या ना कोणत्या मूलद्रव्यांपासून बनलेल्या असतात. अणूची त्रिज्या सुमारे १०**(-१०) मीटर असते आणि त्यात १०**(-१४) मीटर अथवा त्याहूनही लहान आकाराचा एकच अणूगर्भ असतो.

अणूची स्वत:ची अंतर्गत रचना असते. मध्यवर्ती अणूकेंद्रकात (अणूगर्भात) दोन प्रकारचे कण असतात. पदार्थास धन विद्युत भारित करणारे कण धनक (Proton, P) व पदार्थास विद्युत-भार-विहीन म्हणजेच विरक्त करणारे कण विरक्तक (Neutron, N). कोणत्याही मूलद्रव्यातील धनकांची संख्या P आणि विरक्तकांची संख्या N असल्यास त्यांची बेरीज केल्यास अणूचे वस्तूमान अथवा त्याचा अणूभार न समजतो. अणूभार Z =P + N, कोणत्याही मूलद्रव्याचा अणुक्रमांक X हा त्यातील धनकांच्या संख्येइतकाच असतो, म्हणून अणुक्रमांक X=P. अणूकेंद्रकाचा आकार =१०**(-१४) मीटर, अणूचा आकार =१०**(-१०) मीटर. ह्या अणुकेंद्रकाभोवती पदार्थास ऋण विद्युतभारित करणारे अनेक विजक (ऋणक, Electron, E) विशिष्ट कोनातून, विशिष्ट कक्षेत फिरत असतात. प्रत्येक अणूमध्ये धनक व विजकांची संख्या समान असते, त्यामुळे प्रत्येक अणू हा विद्युतभाररहीत असतो. उदासिन अथवा विरक्त असतो. पदार्थाच्या अणूंचे वस्तुमान आण्विक-वस्तुमान-एककांत म्हणजेच 'आवए' मध्ये (ॲटोमिक मास युनिट-amu) मोजले जाते. १ आवए =१.६६ x १०**(-२७) कि.ग्रॅ. धनकाचे वस्तुमान =१.००७२७७ आवए, विरक्तकाचे वस्तुमान =१.००८६६५ आवए, विजकाचे वस्तुमान =०.०००५४९ आवए असते. धनक आणि विरक्तक सुमारे सारख्याच वस्तुमानाचे असतात. विजक मात्र धनकापेक्षा वस्तुमानाने, १,८३६ पट लहान असतो.

**अशी मूलद्रव्ये एकूण आहेत तरी किती?**

आत्तापर्यंत ११८ मूलद्रव्यांची माहिती मिळालेली आहे. त्यांना आवर्त सारणीत (पिरियॉडीक टेबल) त्यांच्या अणुक्रमांकाप्रमाणे ठेवण्यात आले आहे. प्रत्येक मूलद्रव्याच्या अणुकेंद्रकात अस्तित्वात असलेल्या धनकांची संख्या, हाच त्या अणूचा अणुक्रमांक असतो. आवर्तसारणीमध्ये पहिला पदार्थ उद्जन (हायड्रोजन) हा आहे, आणि त्याचा अणुक्रमांक १ आहे. त्याच्या अणुकेंद्रकामध्ये एक धनक असतो. मूलद्रव्यांना ZAX असे दर्शवले जाते. इथे Z म्हणजे अणुभार आहे आणि X म्हणजे अणुक्रमांक. दोघांच्या मध्यभागी असलेला A हा त्या मूलद्रव्याचा निदर्शक असतो. उदाहरणार्थ, २३८U९२ म्हणजे युरेनियम-२३८ या मूलद्रव्याचा अणूभार २३८ आहे आणि त्याचा अणुक्रमांक ९२ आहे; म्हणजेच ह्यामध्ये विरक्तकांची संख्या (२३८-९२)=१४६ आहे.


ज्या मूलद्रव्यांचा अणुक्रमांक समान, परंतु अणुभार वेगळा असतो त्यांना समस्थानिक (isotope) म्हणतात. उदाहरणार्थ, उद्जना (hydrogen) ची तीन समस्थानिके आहेत: १H१, २H१, ३H१ (हायड्रोजन, ड्युटेरियम आणि ट्रिशियम). युरेनियमच्या सर्व समस्थानिकांमधील अणुकेंद्रकांत ९२ धनक असतात. युरेनियमची काही समस्थानिके अशी आहेत: २३४U९२, २३५U९२, २३८U९२.

---

जतन करण्यासाठी सर्वात मौल्यवान वस्तू कोणती असेल तर ते सत्य. - चॅन्सर

## मूलद्रव्यांतील अस्थिरता (एलिमेंटल इन्स्टॅबिलिटी)

सोबतच्या आलेखात निसर्गतः आढळून येणाऱ्या स्थीर व उदासिन मूलद्रव्यांच्या अणुगर्भातील विरक्तकांची संख्या त्यांतील धनकांच्या संख्येसापेक्ष कशी बदलत असते ते दर्शवलेले आहे. मूलद्रव्ये त्यांच्या निर्मितीदरम्यान; जर आलेख रेषेच्या खालच्या भागात असली तर धनक उत्सर्जन करून आणि विजक-प्रग्रहणाद्वारे ती स्थिरतेच्या पट्ट्यांत पावती होतात; किंवा जर ती आलेख रेषेच्या वरच्या भागात असली तर बीटा-उत्सर्जन करून ती स्थिरतेच्या पट्ट्यांत पावती होत असतात. अणुगर्भातील गर्भकांमधील (धनक व विरक्तक यांच्यातील) परस्पर आकर्षण आणि अणुगर्भात जास्त धनक झाल्यास त्या धनकांमधील परस्पर अपकर्षण, या प्रभावांच्या संतुलित अवस्थेत, मूलद्रव्ये स्थिरतेच्या पट्ट्यात येऊन राहू लागतात.




हलक्या मूलद्रव्यांच्या अणुकेंद्रकांमध्ये विरक्तक आणि धनकांची संख्या सर्वसामान्यतः समान असते. २०९Bi८३ म्हणजे बिस्मथ हे सर्वात जड, स्थीर मूलद्रव्य आहे. त्याच्या अणुकेंद्रकामध्ये विरक्तक व धनकांचे प्रमाण १२६/८३ आहे. स्थीर अणुकेंद्रकात धनक आणि विरक्तक यांच्या प्रमाणात कोणताही बदल होत नाही आणि ते कायमस्वरूपी एकत्र राहतात.

अण्वांक ९२ म्हणजे युरेनियम. त्याहून अधिक अण्वांक असलेली मूलद्रव्ये अस्थिर असतात. (अस्थिर असलेली अणुकेंद्रके, किरणोत्सारी ऱ्हासाच्या प्रक्रियेत किरणोत्सर्जन करून स्थीर होतात. किरणांची ही उत्सर्जने म्हणजेच प्रारणे.) ज्यांचा आपण विचार करत आहोत. निसर्गामध्ये आढळणारी काही किरणोत्सारी समस्थानिके ट्रिशियम, कर्ब-१४, युरेनियम, रेडियम, थोरियम इत्यादी आहेत.

** म्हणजे या चिन्हाआधीच्या संख्येचा, या चिन्हानंतर येणाऱ्या संख्येइतक्या संख्येचा घात.

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**०२२-२५४२ ६२७०**

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ६**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत – संपादक*

**दिवस ९ वा शनिवार ३०/११/२०१३**

रामपालबाई रामप्यारी ही धर्मशाळा चालवीत असे. पण तिच्या निधनानंतर तिच्या २ बहिणी आणि संपूर्ण कुटुंब आदरतिथ्यासह ही धर्मशाळा व अन्नक्षेत्र चालवीत आहे. घरातले एक बाबाजी द्वारकानाथप्रसाद यानी अनेकदा (१३ वेळा) परिक्रमा केली आहे. त्यांच्या / रामप्यारीच्या गुरूंनी आज्ञा दिली तेव्हांपासून डिंदोरी येथे गेली २० वर्षे हे कार्य सुरू आहे. घरात बरीच माणसे दिसली. १०–१२ गाईसुद्धा आहेत. मी निघण्यापूर्वी झाडू मागायला घराच्या परसदारी गेलो तेव्हां एक स्त्री रांजणात मोठ्या रवीने उभ्याने दोरीच्या सहाय्याने ताक घुसळत होती. स्नान कपडे ५।। वाजता घाटावर सकाळीच झाले होते. सगळ्यांचे फोटो काढले. खोली झाडून निघालो तर, 'दुपारी जेवूनच जा' असा सार्‍यांचा प्रेमळ आग्रह मोडून मंडला नाक्याकडे निघालो.

उत्तम बाजारपेठ आहे. सकाळी ती बंद असली तरी पोहे जिलबी न्याहारी (१० रु.) करता आली. सकाळी धर्मशाळेत दोनदा चहा झाला होता.

बाजारात काल गूळसुद्धा गाडीवर विक्रीला ठेवलेला दिसला. भाजीपाला स्थानिक आहे तो स्वस्त आहे, पण कांदे बटाटे टमाटे मात्र महागच आहेत.

आता बुटांचा वापर मी बंद केला आहे. तरी रात्री व्हॅसलीन व सकाळी पायाच्या दुखर्‍या बोटांना स्कॉच पट्टी लावली.

मंडला चौक १।। एक कि.मी. वर असावा. रस्त्याला आत वळलो आणि बस आली. महाराजपूरला जाईल कळल्यावर बस धरली. बस नंतर वळून पुन्हा अमरकंटक मार्गाला लागली आणि पुढून पुन्हा उजवीकडे वळून मार्गाला लागली. खरे म्हणजे डिंदोरी मण्डला जाणार्‍या बसने जायचा विचार होता परंतु ही बस नेमकी मधला नदी पूल टाळून दुसर्‍या मार्गाने बिछिया (मंडला) या गावी (तिकीट ७०रु.) जाणारी निघाली. बिछियाला उतरून लगेच बिछिया मण्डला बस मिळाली (५० रु.) तिकीट घेऊन दुपारी साडे–तीन नंतर महाराजपूर गाठले. ओले कपडे खिडकीत ठेवून याच बसमध्ये बर्‍यापैकी सुकविले.

सकाळची न्याहारी आणि वाटेत थोडे शेंगदाणे नव्हे, चणे घेतले. काही शिल्लक आहेत. १. रु. ची चिक्की खाल्ली.

सॅक डिक्कीत ठेवली होती. कारण कॅरिअरवर बसेना व खाली ठेवून मला बसता येणार नाही. सीटवर ठेवू शकत नाही. कारण या बसेस नंतर तुडुंब तुडुंब भरतात. पोहोचल्यावर डिकीतली सॅक काढली तर धुळीने भरली होती.



विचारत विचारत धर्मशाळेकडे येताना एका कुंभाराच्या अंगणात मडक्यांच्या जोडीला घराच्या भिंतीवर मातीचे

काळे मुखवटे टांगले होते. त्यातील वेगळेपण व कलानावीन्य पाहून मागे फिरून अंगणात शिरलो.



कुंभार तिथेच बसला होता. तो एक असामान्य कलाकार असून त्याच्याकडे प्रशस्तिपत्रांचा ढीग आहे. दरवर्षी याच्या मृदकलांचा स्टॉल स्वतः सरकार वा संबंधित संस्था लावतात. दिल्लीपर्यंत याचा नावलौकिक व कलाकारी पोहोचली आहे. मुख्यमंत्री शिवराज यांच्याबरोबरही यांचा फोटो आहे. लष्कराचा कुणी जो परिक्रमेत इथे आला होता त्याने तर त्याच्या कलाकृती लष्करी वाहनातून दिल्लीला नेल्या आहेत.

प्रेमाने दिलेला चहा घेऊन निरोप घेतला व धर्मशाळेच्या शोधात पुढे निघालो. दोन धर्मशाळांचे काम सुरू होते. एका मंदिरासमोरच्या वास्तूच्या पडवीत काही परिक्रमावासी दिसले परंतु ती अस्वच्छ, सोडून दिलेली व अप्रशस्त इतकी बाहेरून पाहिल्यावर त्या अमंगळ ठिकाणी जायचीही इच्छा झाली नाही. आणखी एका बंद धर्मशाळेबाहेर सचिंत उभा असताना हाक आली व किरण नावाच्या (सूर्यवंशी) महिलेने चौकशी करून एक खोली मला दिली. कुणी सांगितलेली पवार धर्मशाळा नंतर समोर उजव्या हाताला दिसली.

खोली नीट आहे ७' X १०' असावी. शेणाने सारविलेली जमीन आहे. खोलीला खिडकी नाही पण दिवा, पंखा, चार्जिंग पॉईंट आहे.

डास भरपूर आहेत, काळजी म्हणून बाजारातून जावून ऑडोमॉस ट्यूब आणली व येताना दहा रुपयांची मुळ्याची भाजीही आणली व दिली. रस्त्यात एक मुळा खाल्ला, एक ठेवला व बाकी घरात दिली. (१० रु.ला ७ मुळे)

ही किरार धर्मशाळा फार जुनी आहे. तिथे राहणारे सूर्यवंशी कुटुंब तिची नीट व्यवस्था ठेवते. पुढे मागे प्रशस्त पडवी आहे. रात्री मागच्या पडवीत स्वयंपाक भोजन सर्व झाले. खोलीत 'ऐच्छिक देणगीने द्या' अशी सूचना नाही.

भोजनाच्या अगोदर नदीवर स्नानाची व्यवस्था आणि बाजूला सुलभ प्रसाधन गृह, जे २४ तास सुरू असते ते पाहून आलो. कारण पहाटे हे सांगायला मला कुणीच भेटले नसते.

सूर्यवंशी कुटुंब क्षत्रिय आहे आणि बालाघाटमधून इथे आले. पूर्वज राजस्थानातून इकडे आले.

महाराजपूर संगम सुशोभिकरणात ही पुरातन धर्मशाळा बहुधा पाडली जाणार आहे. किरणचे आईवडील जवळच एक चहा, न्याहारीचे दुकान चालवितात. नदीवर छान रुंद व लांब पायऱ्यांचा घाट आहे. एक सुंदर शिवमंदिर घाटाच्याही वर पायऱ्या चढून जावे लागते असे आहे. बुढीमाई मंदिर आहे. जवळच मोठा वृक्ष आहे. एकूण स्थान रमणीय आहे. बंजारा, सरस्वती व नर्मदा असा त्रिवेणी संगम असल्याने तीर्थाला महत्त्व आहे.

**दिवस १० वा रविवार १/१२/२०१३**

सकाळी जाग आली तेव्हा ५।। वाजले होते. रात्री मोबाईल नंतर कॅमेरा सेल चार्जिंगला लावले होते ते मध्ये जाग न आल्याने रात्रभर चार्जिंगवर होते.

सकाळी नदीवर स्नान आटपून सर्व पॅकिंग केले व नंतर जाऊन बरेच फोटो काढले. (५० रु. देणगी धर्म शाळा) राजवाडा सदृश वास्तू आणि प्रांगणातील राजेशाही भव्य मंदिर पाहिले. या घराण्यातील वंशज इथे अजून

राहतात. पलीकडल्या तीरावरही किल्ला आहे. म्हणून इथल्या रेल्वे स्टेशनचे नाव 'मंडला फोर्ट' आहे.

न्याहारी म्हणजे दोन समोसे खाऊन ९ची महाराजपूर बालाघाट ही मीटर गेज गाडी धरली व नैनीपूर (ति.१० रु. ४३ कि.मी.) या जंक्शनला ११ वाजता उतरलो व १ वाजता बालाघाट-जबलपूर ही तशीच पॅसेंजर धरली व बर्गी येथे (तिकीट २० रु.) उतरलो.

गाडी तुडुंब होती. दोन्ही गाड्यांत मला बसायला मिळाले. बैठका अरुंद असल्याने त्रासदायक वाटतात. गाडीत भरपूर माणसे भरपूर सामानासह प्रवास करत असली तरी कुणाची कुरकूर दिसली नाही. माणसे तर आताच्या गाडीच्या टपावरही बसली होती.

सर्वजण एकमेकांना सांभाळून आनंदाने प्रवास करतात. हे लोक फार साधेभोळे सरळ मनाचे व सहनशील दिसतात. खेड्यातल्या लोकांचा साधा खेडवळ भाव यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट प्रकटतो आणि शहरी वातावरणात काढलेल्या माणसाचा एक प्रकारचा बेरकी किंवा पॉलिश्ड अहंमान्य भाव वेगळा उठून दिसतो. शहर आणि खेडे यातला किती हा दृश्य परिणाम!

अर्थात द. मा. मिरासदारांच्या कथांमधून बेरकी खेडूत या गोष्टीला छेद देतात हे खरेच; काही टक्के बेरके व उरलेले साधे असे समीकरण सर्व समाजात असले तरी शहरात बेरकीपणा फारच अधिक असतो हे खरे!

बर्गीला उतरल्यावर स्टेशनवर रात्र काढावी लागेलसे वाटले होते. कारण गाडी संध्याकाळी ५ वाजता पोहोचली व बर्गी कॉलनी १५ कि.मी. दूर होती.

गावात एक मंदिर आहे. त्या अनुरोधाने गावात शिरलो. प्रजापती वस्ती होती. तीन शिखरे पाहून एका गल्लीत वळलो तर एका महिलेने थांबवून सांगितले की हे जैन मंदिर आहे. तिथे काही सोय नाही आणि हिंदूंच्या नर्मदा परिक्रमेशी त्यांना काही देणे घेणे नाही.

शिवमंदिराच्या शोधात एक धर्मशाळा मिळाली. ते एक एकमजली प्रशस्त घर दिसले का घराला जोडून काटकोनात एक भव्य पडवी जी ३०/४०' लांब व २०' उंच असावी. पुढून अर्थात उघडी होती.

कोमलबाई पाण्डे नावाच्या वृद्धेने निवारा दिला. बाहेर सदावर्त मिळते हे सांगितले व थंडीसाठी माझ्याकडे पुरेसे साधन नाही म्हटल्यावर 'इथे काही साधन नाही' हे सांगितले.

गच्चीवरील टाकीत पाणी नव्हते. परंतु सुलभ व चालवायला हलका असा छान हॅण्डपम्प घराच्या पडवीत तळमजल्याला होता. ५/६ शौचालये. आतमध्ये नळ व बादल्या. शिवाय शौचालयांसमोर आणि हॅण्डपम्पच्या बाजूला मिळून १०हून अधिक तोट्या होत्या.

शौचालये नवीन होती आणि घरही नवेच असावे. सोनी नामक कुणी नरसिंगपूर निवासीने ही व्यवस्था केली आहे. कोमलबाई पूर्वायुष्यात चारीधाम फिरलेली आहे व चांगली आहे. ती आता एकटीच व निराधार असून इथली व्यवस्था पाहते. अंगणात चूल, लाकडे वगैरे व्यवस्था आहे.

कालच इथे १०/१२ परिक्रमावासी होते. भोजन तयार करून जेवले व संध्याकाळी बर्गी कॉलनीकडे रवाना झाले असे कळले. परिक्रमावासी आले की त्यांची पूजा-अर्चा इ. मुळे कोमलबाईला आनंद होतो.

गेले ५/६ दिवस इथे एक आजारी साधू वस्तीला आहे. सरकारी इस्पितळाचे उपचार घेतोय! रात्री बिस्किटे, उरलेला मुळा, थोडे चणे आणि एक पेरू खाऊन भूक भागविली. जास्तीचे सर्व कपडे घालूनही रात्री थंडी वाजत होती.

**- अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

जे दिव्याच्या प्रकाशात खरे वाटते ते सूर्यप्रकाशात खरे ठरतेच असे नाही. - जुबर्ट

# ओळख वनस्पतींची
# करवंदे, एक अनोखा रानमेवा

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील विसावा भाग. 'करवंदे, एक अनोखा रानमेवा' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे – संपादक*

मित्रांनो जी गोष्ट सहज मिळते त्याची आपल्याला किंमत नसते. खूप कष्ट करून मिळविलेल्या अगदी टाकावू वस्तूचेही अप्रूप असते किंवा एखादी वस्तू भरमसाठ खर्च करून विकत आणलेली असते, तिचेच आपणास मोल असते. निसर्गातील अनेक गोष्टी अगदी विनासायास आपल्याला मिळत असतात, त्यामुळे त्याचे महत्त्व केवळ त्या गोष्टी दुर्मिळ झाल्यावरच कळते. निसर्गात आपल्या आजूबाजूला अशी बरीच झाडे झुडपे असतात. अनेक औषधी गुणांनी परिपूर्ण असूनही केवळ विपूल प्रमाणात आहेत, म्हणून त्याकडे दुर्लक्ष होते. असेच सदैव दुर्लक्षिली गेलेली अनेक झाडे आहेत. त्यापैकी एक आहे करवंद. भारतात सर्वत्र आढळणारे हे झुडुप माळरानावर, डोंगर उतारावर अन् दाट जंगलात देखील हे आढळून येते. ६ ते १० फूट उंचीपर्यंत वाढणाऱ्या या झुडपाने स्वतःची संरक्षण व्यवस्था स्वतःच केली आहे. दणकट व सरळ काट्यांच्या जोड्या, या काट्यांना टोकाशी फाटे फुटलेले, चुकून कुणाच्या हातात किंवा पायात शिरला तर अनेक दिवस वेदनेने तळमळत ठेवण्याची याची उपद्रव क्षमता. यामुळे यापासून माणूस तसेच जनावरे देखील वचकूनच असतात. एकदा बी रुजले व अनुकूल वातावरणात एक वर्षभर जगले की पुढील वर्षी कितीही प्रतिकूल परिस्थिती येऊ देत; करवंदाचे झाड मात्र मुकाबला करण्यास सदैव सिद्ध असते. या झुडपाला एखाद्या मोठ्या वृक्षाचा आधार मिळाला तर अगदी २० फुटापर्यंत उंचावर जाऊ शकते.



एकासमोरएक असणारी लंब गोलाकार ३ इंच लांबीची व १.५ ते २ इंच रुंदीची हिरवी पाने. या पानांना तजेलदार गुळगुळीतपणा लाभला आहे. पान, फळ किंवा फांदीचा शेंडा खुडला की त्यातून पांढरा चिक निघतो. झाड सदैव हिरवेगार दिसते. साधारण जानेवारी ते एप्रिल या काळात यावर पांढऱ्या रंगाच्या सुंदर फुलांचे झुबके दिसू लागतात. या फुलांना मंदसा सुगंध असतो. आत दुमडलेल्या पाच टोकेरी पाकळ्यांच्या मध्ये केशरी रंगाची लांब नळी पारिजातकाच्या फुलांची आठवण करून देणारी, पण तुलनेने लांब असलेली झाडावर हळूहळू गोल मण्यासारखी हिरवट फळे दिसू लागतात.

फुलांसोबत फळे देखील झाडांचे सौंदर्य खुलवीत असते. सुरुवातीस हिरवट लाल दिसणारी एक ते दीड सें.मी. लांबीची फळे हळूहळू काळसर जांभळ्या रंगाची दिसू लागतात. त्यांचा आस्वाद घेण्यासाठी आता अगदी तयार आहेत असे समजावे. कच्च्या फळांची चव आंबट तुरट असली तरी पिकलेली फळे अवीट गोडीची असतात. कच्ची फळे देखील चटण्या तसेच लोणची करण्यासाठी उपयोगात आणतात.

प्रादेशिक हवामानानुसार करवंदाच्या लहानमोठ्या आकाराची फळे देणाऱ्या जाती आहेत. आपल्याकडे सर्व साधारणपणे दिसणारी जात आहे. Carissa carandas या शास्त्रीय नावाने ओळखली जाणारी ही झाडे अगदी हिमालयात १८०० मीटर उंचीपर्यंत आढळतात. संपूर्ण भारतीय उपखंडात आढळणारी ही जात स्थानिक रहिवास्यांना चांगली परिचयाची आहे. ग्रामीण भागातील लोकांचा तो रानमेवा म्हणूनच ओळखला जातो.

करवंदाची दुसरी जात आहे Carissa spinorium या शास्त्रीय नावाने ओळखली जाणारी. ही फळे मोठी व अंडाकृती असून रंग गुलाबी हिरवा असा असतो. ही फळे शोभेसाठी तसेच केसांमध्ये माळण्यासाठी वापरतात. वास्तविक ती फळे देखील खाण्यासाठी तेवढीच रुचकर आहेत. ती फळे देखील चटणी व लोणची करण्यासाठी वापरतात.

यात लोहाचे समृद्ध प्रमाण आहे. तसेच क जीवनसत्वाने परिपूर्ण असे हे फळ रक्तवृद्धीसाठी औषध म्हणून देतात. रक्ताची कमतरता असणाऱ्या ॲनामियाच्या रुग्णांसाठी हे फळ एक वरदान आहे. हल्ली या फळापासून जॅम, जेली तथा सरबत तयार करतात. बचतगटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना चांगला रोजगार मिळाला आहे.

या झाडांची लागवड बीयांपासून तसेच कलमांद्वारे करण्यात येते. आता शहरी भागातून देखील करवंदांना चांगली मागणी आहे. त्यामुळे काही भागामध्ये याची शेती देखील करतात. मोठी करवंदे त्यांच्या सुंदर गुलाबी हिरव्या रंगामुळे वेगवेगळ्या सजावटीसाठीही वापरतात. उन्हाळ्यात प्रवास करताना अनेक स्टेशनवर किंवा बस थांब्यांवर आदिवासी महिला करवंदे विकण्यासाठी येतात. पळसाच्या पानांचा वैशिष्ट्यपूर्ण द्रोण करून त्यात रसरसीत करवंदे सुंदर पद्धतीने रचून ठेवलेली असतात. आदिवासींसाठी उपजीविकेसाठी एक साधन या करवंदांमुळे मिळाले आहे. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांना आर्थिक मदत करण्यासाठी ही करवंदे अवश्य घ्यावीत व या अनोख्या रानमेव्याचा आस्वाद घ्यावा.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# व्यथा बलुचिस्तानची

*पाकिस्तानातील बलुचिस्तान ह्या प्रांतातील समस्येवर प्रकाश टाकणारा लेख - संपादक*

आपण कधीतरी बलुचिस्तानविषयीच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये वाचत असतो. येथे 'कधीतरी' हा शब्द वापरण्याचे कारण म्हणजे पाकिस्तान सरकार नेहमीच बलुचिस्तानविषयीच्या बातम्या दडपण्याचा प्रयत्न करत असते. दूरदर्शन संचावरसुद्धा वृत्तवाहिन्यांनी बलुचिस्तानाविषयी प्रदर्शित केलेली बातमीपत्रे वा चित्रफिती आपण क्वचितच पाहत असतो. ह्या प्रांतामध्ये मोठ्या प्रमाणात पाकिस्तानच्याबाबतीत जनमानसामध्ये असंतोष असलेला आढळतो. तसे पाहता, पाकिस्तानचे सरकार बलुचिस्तान हा पाकिस्तानचा अविभाज्य घटक असल्याची भूमिका घेताना दिसते. परंतु बलुचिस्तानमधील बहुसंख्य जनता आपण पाकिस्तान ह्या देशाचा भाग नाही असे मानते. येथील बलुच जनतेला पाकिस्तानापासून स्वातंत्र्य हवे असल्याचे आपल्याला प्रकर्षाने जाणवते.

बलुचिस्तान हा पाकिस्तानच्या सरकारनुसार पाकिस्तान ह्या देशाचा एक प्रांत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सिंध, पंजाब व नॉर्थ-वेस्ट फ्रंटियर प्रोव्हीन्स (वायव्य सरहद्द प्रांत) हे पाकिस्तानचे इतर तीन प्रांत होत. बलुचिस्तानातील लोक जवळ जवळ गेल्या सत्तर वर्षांपासून पाकिस्तानापासून वेगळे होण्यासाठी लढा देत आहेत.

बलुचिस्तान हा प्रांत साधारणतः पाकिस्तानच्या पश्चिमेला व नैऋत्येला (West and South-West) आहे. हा प्रांत पाकिस्तानातील सर्वात मोठा प्रांत आहे. येथील लोकांना 'बलुच' असे संबोधले जाते. दोन हजार अकराच्या जनगणनेनुसार या प्रांताची लोकसंख्या एक कोटी एकतीस लाखापेक्षा जास्त होती. परंतु या लोकसंख्येत पाकिस्तानच्या इतर प्रांतांतून स्थलांतरीत झालेल्या सिंधी, पंजाबी, पठाणी इत्यादी लोकांचाही समावेश होता. बलुचिस्तानच्या उत्तरेला अफगाणिस्तान, पश्चिमेला इराण व दक्षिणेला अरबी समुद्र आहे. बलुच लोकांमध्ये क्रमाने वृक्षानी, सुलेमाने आदिभाषा बोलणारे गट आढळतात. बलुचिस्तानच्या प्रांतीय असेंब्लीमध्ये ६५ लोक प्रतिनिधी निवडून जातात. तर पाकिस्तानच्या नॅशनल असेंब्लीमध्ये म्हणजेच पाकिस्तानच्या संसदेमध्ये बलुचिस्तानातून फक्त १४ प्रतिनिधी निवडून जातात. पाकिस्तानातील नॅशनल असेंब्लीत (National Assembly) पंजाब या प्रांतातून सर्वात जास्त म्हणजे १४८ पुरुष व ३५ महिला प्रतिनिधी निवडून जातात. त्यामुळे बलुचिस्तान हा प्रांत पाकिस्तानातील सर्वात मोठा प्रांत असला तरी राजकीय दृष्ट्या त्याला जास्त महत्त्व दिले जात नाही असे निदर्शनास येते. याउलट पंजाब प्रांतातून तुलनेने जास्त प्रतिनिधी निवडून जात असल्यामुळे पाकिस्तानच्या राजकारणावर पाकिस्तानातील पंजाबी लोकांचा वरचष्मा असल्याचे लक्षात येते. कदाचित त्यामुळेच बलुच माणसाला या पंजाब्यांबद्दल फक्त रागच नव्हे तर घृणा आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. पाकिस्तानातील सत्ताकारणाचे निरीक्षण केल्यावर असे लक्षात येते की, पाकिस्तानच्या राष्ट्रीय सरकारात अनेक मंत्री पंजाबी असल्याचे दिसते. पाकिस्तानचे सर्वश्रूत असलेले पाकिस्तान मुस्लीम लीग या पक्षाचे नेते व अनेकदा पंतप्रधान राहिलेले नवाझ शरीफ हेसुद्धा पंजाब प्रांतातीलच. एवढेच काय परंतु पाकिस्तानातील निवडणूकीच्या मार्गाने स्थापन झालेली सरकारे जबरदस्तीने बरखास्त करून तेथील लोकशाहीची

लक्तरे वेशीवर टांगणारे अनेक लष्करप्रमुख वा लष्करशहा हे सुद्धा पंजाब प्रांतातूनच आलेले आढळतात. ह्या सर्व राजकीय स्थितीमुळे पाकिस्तानच्या राजकारणावर व अर्थकारणावर पंजाब्यांचा नेहमीच वरचष्मा राहिलेला आहे यात वाद नाही. नेमकी हीच गोष्ट इतर प्रांतातील लोकांना खटकते व पंजाब्यांविरुद्धचा असंतोष बलुचिस्तान ह्या प्रांतात प्रकर्षाने जाणवतो.

बलुचिस्तान ह्या प्रांतात एकूण ३२ जिल्हे असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – चगाई (Chagai), वाशुक (Washuk), पंजगुर (Panjgur), केच–तुरबत (Kech-Turbat), ग्वदार (Gwadar), अवारण (Awaran), लासबेला (Lasbela), खुझदर (Khuzdar), खारण (Kharan), कलाल (Kalal), नुश्की (Nushki), मास्तुंग (Mastung), कच्छी–बोलन (Kachhi-Bolan), डेरा बुग्ती (Dera Bugti), हरणाई (Harnai), जाफराबाद (Jafarabad), झाल माग्सी (Jhal Magsi), कोहलू (Kohlu), किला अब्दुल्लाह (Killa Abdullah), किला सैफुल्लाह (Killa Saifullah), मुसाखेल (Musakhel), नासिराबाद (Nasirabad), पिशिन (Pishin), क्वेट्टा (Quetta), शेराणी (Sherani), सिबी (Sibi), झोब (Zhob), झैरात–झिमारत (Zairat), लेहरी (Lehri) व सोहबतपूर (Sohbatpur). ह्या सर्व जिल्ह्यांमध्ये चगाई हा सर्वात मोठा जिल्हा आहे. १९९८ साली पाकिस्तानने ह्याच जिल्ह्यामध्ये अण्वस्त्र चाचण्या घेतल्या होत्या १९९८ सालीच तत्कालीन पंतप्रधान माननीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारने अण्वस्त्र चाचण्या घेऊन सर्व जगाला दाखवून दिले होते की, भारत देखील अण्वस्त्रधारी देश आहे. परंतु त्याचसोबत वाजपेयी सरकारने भारत स्वतःहून प्रथम ह्या अण्वस्त्रांचा वापर शत्रूविरोधात करणार नाही असे जाहीर करून भारत एक शांतताप्रिय व जबाबदार देश आहे हे सर्व जगाच्या निदर्शनास आणून दिले होते. मात्र, भारताच्या ह्या अण्वस्त्र चाचण्यांना उत्तर म्हणून पाकिस्तानने त्यावेळी लगेचच अण्वस्त्र चाचण्या केल्या होत्या व आपण जर युद्धाची वेळ आली तर शत्रूवर (येथे भारत अभिप्रेत आहे) प्रथमतः अण्वस्त्रांचा हल्ला करू अशा प्रकारचे मस्तवालपणाचे वक्तव्य केले होते. असो. बलुचिस्तानातील झिमारत हा जिल्हा सर्वात लहान जिल्हा आहे.

आपण बलुचिस्तानच्या भूभागाचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, हा प्रदेश खनिज संपत्तीने संपन्न आहे. बलुचिस्तानच्या भूमीत तांबे, गंधक, लोखंड, बॉक्साइट, दगडी कोळसा इत्यादी खनिजे विपुल प्रमाणात सापडतात. त्यामुळेच पाकिस्तानला कुठल्याही परिस्थितीत ह्या प्रदेशावर आपले प्रभूत्व व नियंत्रण ठेवायचे आहे. नेमकी हीच बाब बलुच जनतेला खटकते. बहुसंख्य बलुचांचे म्हणणे आहे की, पाकिस्तान सरकारने ह्या खनिज संपत्तीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा बलूच जनतेला सुद्धा दिला पाहिजे. ही गोष्ट पाकिस्तानला मान्य नसल्याचे जाणवते. बलुचिस्तानातील बरेचसे लोक मेंढीपालन, मासेमारी व शेतीमध्ये गुंतलेले आढळतात. तसे पाहता पाकिस्तानने हा प्रदेश जाणिवपूर्वकरित्या अप्रगत ठेवलेला असल्याचे जाणवते. याचे कारण १९४७ पासूनच बलुच जनतेने मनापासून कधीही आपण पाकिस्तानचे अविभाज्य घटक आहोत असे मानलेले नाही. त्यामुळेच अशा लोकांना धडा शिकविण्यासाठी म्हणजेच हेतुपुरस्कर छळण्यासाठी पाकिस्तान सरकारने ह्या भागातील मूलभूत सुविधांकडेसुद्धा दुर्लक्ष केलेले जाणवते. ह्या सगळ्यांचा रोष साहजिकच बलुच जनतेच्या मनात आहे. बलुचिस्तानात आजही प्रवास करण्याजोगे चांगले रस्ते उपलब्ध नाहीत. बलुचिस्तानचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे येथे नैसर्गिक वायूचे साठे देखील विपुल प्रमाणात आहेत. बलुच माणसाच्या दृष्टीने पाकिस्तान सरकार ह्या सर्व अमूल्य साधन संपत्तीची लूट करत आहे व

बलुच्यांना वाऱ्यावर सोडत आहे.

बलुचिस्तानच्या दृष्टीने पाकिस्तानने केलेला अजून एक बदमाशपणा म्हणजे त्यांनी बलुचिस्तानची कवाडे चीनला उघडी करून देणे हा होय. पाकिस्तानने चीनला ह्या प्रांतातून रस्ते व लोहमार्ग बांधण्यासाठी दिलेली परवानगी बलुच जनतेला अजिबात रुचलेली नाही. बलुचिस्तानमधील अनेक कुटुंबे चीनद्वारे बांधल्या जाणाऱ्या ह्या लोहमार्गांसाठी व रस्त्यांसाठी आपली जागा देण्यास तयार नाहीत. एवढेच नव्हे तर, कुठल्याही पातळीवर जाऊन ह्या चीन पुरस्कृत प्रकल्पांना ते विरोध करण्यास तयार आहेत. आपणा सर्वांना ठाऊकच आहे की, चीनने अक्साई चीन ह्या भागात महामार्ग बांधलेला आहे. अक्साई चीन हा काश्मीरचाच व भारताचाच एक भाग असून चीनने बेकायदेशीररित्या तो गिळंकृत केला आहे. त्याचप्रमाणे गिलगिट बाल्टिस्तानातून (गिलगिट –बाल्टिस्तान हे प्रदेश पाकिस्तानने बेकायदेशीररित्या बळकावलेल्या पाकव्याप काश्मीरमध्ये असून पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरचे दोन विभागांत विभाजन केले आहे. हे विभाग म्हणजे गिलगिट–बाल्टिस्तान व मिरपूर–मुझफ्फराबाद हे होत. उद्दाम पाकिस्तान सरकार व यंत्रणा ह्या दोन विभागांचा 'नॉर्थन एरियाज' व 'आझाद काश्मीर' असा उल्लेख करताना आढळतात. मात्र प्रत्यक्षात हा सर्व प्रदेश कायदेशीररित्या भारतातच आहे.) चीनला 'चायना–पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर' बनवायचा आहे. यात महामार्ग, लोहमार्ग, विशेष आर्थिक क्षेत्रे इत्यादींचा समावेश आहे. चीनला ह्या प्रकल्पांतर्गत बांधण्यात येणारे महामार्ग व लोकमार्ग पुढे उत्तर पाकिस्तानातून दक्षिणेकडील सिंध व प्रामुख्याने बलुचिस्तान ह्या प्रांतापर्यंत न्यावयाचे आहेत. हे महामार्ग व लोहमार्ग चीन मुख्यतः बलुचिस्तानातील 'मकरन' ह्या प्रांतातील ग्वदार (Gwadar) ह्या बंदरापर्यंत नेणार आहे. निदान त्यांचा तसा मानस तरी आहे.

बलुचिस्तानातील बहुतांश भाग वाळवंट व डोंगरांनी व्यापलेला आहे. अभ्यासकांच्या मते फिरदोस लिखित 'शाहनामा' या ग्रंथात बलुच लोकांचा उल्लेख केला आहे. हा बलुच लोकांविषयीचा पहिला ऐतिहासिक उल्लेख असल्याचे म्हटले जाते. अबू–ई–कासिल फिरदाऊसी तुस्सी हा दहाव्या व अकराव्या शतकातील इराणी कवी होता. बलुचिस्तानामध्ये पावसाचे प्रमाण फार कमी आहे. भारत व पाकिस्तानची फाळणी झाली तेव्हा बलुचिस्तानातील क्वेट्टा हे सर्वात मोठे शहर होते. सध्या तुरबत, चमन, खुस्दार व सिबी ही मोठी शहरे आहेत. अगोदर नमूद केल्याप्रमाणे पाकिस्तानने नेहमीच बलुचिस्तानाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे बचुचिस्तानात मोठ्या प्रमाणात बेकारी, गरिबी व दारिद्र्य जाणवते.

बलुचिस्तानातील कलात या प्रांतावर भारत–पाकिस्तान फाळणीपूर्वी जी सत्ता होती तिला 'कलातची खान सत्ता' असे म्हणत. एकोणिसाव्या शतकात कलातच्या नासीर खान यांनी त्यावेळेस ब्रिटिशांना हैरान करून सोडले. आपण भारत पाकिस्तान फाळणीपूर्वीचा इतिहास अभ्यासला असता असे लक्षात येते की, ब्रिटिशकाळात बलुचिस्तानामध्ये चार संस्थाने होती. ही चार संस्थाने म्हणजे कलात, लासबेला, खाराण व मकरान (ह्या प्रांताचा उल्लेख काही ग्रंथांमध्ये 'मकरन' असा केलेला देखील आढळतो) ही होत. यापैकी लासबेला व खाराण (खारण) ही संस्थाने एक प्रकारे कलातच्याच अधिपत्याखाली होती व मकरान हा कलात मधीलच एक जिल्हा होता.

पाकिस्तानच्या निर्मितीच्या अवघ्या तीन महिन्यांत अगोदरच अखंड भारताची फाळणी घडवून आणणारे झारीतील शुक्राचार्य म्हणजेच मुहम्मद अली जिन्नाह (जिना) यांनी कलातच्या नेतृत्वाखाली बलुचिस्तानला स्वातंत्र्य देण्यात यावे अशा आशयाची चर्चा केली होती. भारताची फाळणी होणार व पाकिस्तानची निर्मिती होणार हे निश्चित झाल्यावर भारताचे तत्कालीन ब्रिटिश

व्हाईसरॉय, जिन्नाह व कलातचे खान यांच्या दरम्यान कलातचे पाकिस्तानसोबत कुठल्या प्रकारचे संबंध असतील याविषयावर चर्चा झाली होती. ह्या चर्चेनंतर जो निर्णय झाला होता त्यानुसार जिन्नाह यांनी कलातचे स्वातंत्र्य मान्य केले होते. मात्र ऑक्टोबर १९४७ पर्यंत जिन्नाह यांच्या विचारांमध्ये बदल झालेला होता व कलात सोबत झालेल्या पूर्वीच्या चर्चा तसेच करार यांचा त्यांना रीतसरपणे विसर पडलेला होता. आता त्यांना कलात म्हणजेच बलुचिस्तानने पाकिस्तानात सामील व्हावे असे वाटत होते. परंतु कलातच्या खानांना आपले स्वातंत्र्य गमवायचे नव्हते. आपले संपूर्ण स्वातंत्र्य पाकिस्तानच्या स्वाधीन न करता खान संरक्षण, परराष्ट्र संबंध व दळणवळण ह्या विषयांबाबतीत पाकिस्तान सोबत जुळवून घेण्याच्या मनस्थितीत होते. म्हणजेच ह्या तीन विषयांबाबतीत एका अर्थाने पाकिस्तान सरकारने निर्णय घेण्यास हरकत नसावी अशा आशयाचा पाकिस्तान सोबत करारनामा करण्यास ते उत्सुक होते. परंतु त्यांना कुठल्याही परिस्थितीत इतर बाबतीत आपल्या स्वातंत्र्यावर पाकिस्तान तर्फे घाला येईल वा यावा हे मान्य नव्हते. परंतु १९४८ साल उजाडेपर्यंत जिन्नांहची (जिन्नांची) मजल कलातच्या खानांना त्यांनी आपले संस्थान पाकिस्तानात विलीन करावे असे सांगण्यापर्यंत गेली होती. १९४८ च्या फेब्रुवारी महिन्यात जिन्नाहंनी बलुचिस्तानला भेटसुद्धा दिली होती. ह्याच महिन्यात कलातच्या खानांनी कलातला पाकिस्तानात विलीन न करता कलातचे पाकिस्तान सोबत भविष्यात कुठल्या प्रकारचे संबंध असू शकतील याबाबतीत तह करण्यासाठीचे आपले मत बनवले होते.

मार्च १९४८ पासून पुढील घटना तर अतिशय नाट्यमयरित्या घडत गेल्या. २३ मार्च १९४८ साली खारन, लासबेला व मकरान हे विभाग पाकिस्तानात विलीन झाले आहेत अशा आशयाची माहिती अमेरिकेच्या पाकिस्तानातील तत्कालीन राजदुताने दिलेली आढळते. खारन, लासबेला व मकरान हे विभाग पाकिस्तान सरकारने पाकिस्तानात विलीन करून घेतले आहेत हे कळल्यावर कलातच्या खानांनी नाराजी व्यक्त केली होती व असे करून पाकिस्तान कलातसोबत या अगोदर केलेल्या करारांचे उल्लंघन करत असल्याचे म्हटले होते. पुढे चालून तर २६ मार्च १९४८ व १ एप्रिल १९४८ रोजी पाकिस्तानने बलुचिस्तानात सरळ सरळ सैन्य घुसविल्याचे व आक्रमण केल्याचे निदर्शनास येते. अशाप्रकारे बळाचा वापर करून पाकिस्तानने कलातच्या खानांकडून बलुचिस्तान पाकिस्तानात विलीन करत आहोत असे वदवून घेतले. परंतु बलुचिस्तानच्या असेंब्लीला बंदुकीच्या जोरावर बलुचिस्तानचे पाकिस्तानात करवून घेतलेले विलिनीकरण मान्य नव्हते. अभ्यासक म्हणतात की, ब्रिटिशांनी भारत सोडल्यावर व भारताची फाळणी झाल्यानंतर बलुचिस्तानचे सार्वभौमत्व पाकिस्तानने अवघ्या २२७ दिवसांमध्ये संपुष्टात आणले. तोपर्यंत बलुचिस्तानचा दुतावास पाकिस्तानातील कराची ह्या शहरात होता व बलुचिस्तानचे पाकिस्तानातील राजदूत तेथेच असत. पाकिस्तानातील यंत्रणा एकंदरीतच बलुचिस्तानविषयी जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरविण्याचा उद्योग करत असते. ह्यामागचा एकमेव हेतू म्हणजे बलुचिस्तानच्या इतिहासाबाबत खोटे दावे करून बलुच अस्मिता व त्यांची चळवळ दडपून टाकणे होय.

पाकिस्तान हेतुपुरस्कर व जाणीवपूर्वक भारतातील काश्मीर ह्या प्रांताविषयीसुद्धा आंतरराष्ट्रीय पातळीवर खोट्या वावड्या उठवण्याचे उद्योग करत असते. काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक असूनसुद्धा पाकिस्तान तेथे दहशतवादी कारवाया करण्यात गुंतलेले असते व तेथील फुटीरवादी प्रवृत्तींना खतपाणी घालत असते. पाकिस्तानने फाळणीनंतर काश्मीरवर आक्रमण करण्याचे जे पातक केले अगदी तेच पाप त्यांनी बलुचिस्तानबाबत सुद्धा केलेले आढळते. भारत सरकार आतापर्यंत अतिशय

जबाबदारीने काश्मीरमधील स्थिती हाताळताना दिसते तर अगदी याउलट पाकिस्तान बलुचिस्तानातील जनतेवर अन्याय व अत्याचार करण्यात गुंतलेले दिसते. अर्थात, काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे व राजा हरिसिंग यांनी फाळणीनंतर रीतसर करार करून कायदेशीररित्या काश्मीर संस्थान भारतात विलीन केले होते. पाकिस्तानने काश्मीरच्या डोंगराळ व दुर्गम भागातील खुंखार मुस्लीम टोळ्यांना हाताशी धरून काश्मीरवर आक्रमण केल्याचा गुन्हा नव्हे कायदाबाह्य कृत्य केले होते. आजही सर्व जगाला माहिती आहे की, काश्मीर व भारतातील इतर ठिकाणीदेखील होणाऱ्या दहशतवादी कारवायांच्यामागे पाकिस्तानचाच हात असतो. एवढेच नव्हे तर, लष्कर-ए-तैयब्बा, जैश-ए-मुहम्मद व इतर अनेक अतिरेकी संघटनांची मुख्यालये व त्यांची अतिरेक्यांना प्रशिक्षण देणारी केंद्रे पाकिस्तानच्या भूमीवरच आहेत. २०११ मध्ये अमेरिकेच्या दृष्टीने जो सर्वात जास्त खतरनाक अतिरेकी होता तो ओसामा-बिन-लादेन पाकिस्तानच्या लष्कराचे केंद्र असलेल्या अबोटाबाद ह्या शहरात लपून बसला होता. ओसामा-बिन-लादेन पाकिस्तान सरकारच्या व लष्कराच्या तसेच त्या देशाची गुप्तहेर संघटना इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स-आय.एस्.आय. (I.S.I.) यांच्या आश्रयाशिवाय तेथे लपून बसणे शक्य नव्हता हे उघड सत्य आहे. असो. तर मुद्दा असा आहे की, जो पाकिस्तान काश्मीर प्रश्नावरून भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनामी करत असतो तोच देश बलुचिस्तानच्या जनतेला गेल्या सत्तरहून जास्त वर्षे नागवत आहे व त्यांच्यावर पराकोटीचा अत्याचार करत आहे.

बलुचिस्तानातील जनता बलुच रिपब्लीकन आर्मी, बलुच लिबरेशन आर्मी, बलुच लिबरेशन फ्रंट इत्यादी संघटनांच्या माध्यमातून पाकिस्तानच्या जुलमी राजवटीविरुद्ध आवाज उठवत असते. बलुचिस्तानात नेहमीच पाकिस्तानच्या सरकारविरुद्ध व त्यांच्या दडपशाहीविरुद्ध निदर्शने होत असतात. बलुचिस्तानातील तरुणांमध्ये पाकिस्तानच्या राजवटीविरुद्ध मोठ्या प्रमाणात असंतोष असल्याचे जाणवते.

कलात पाकिस्तानामध्ये विलिन होणार नाही हे लक्षात आल्यावर जिनांनी (जिन्नाह) अकबर खान ह्या लष्करी अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली कलातवर म्हणजेच बलुचिस्तानवर हल्ला करण्याचे आदेश दिले होते. ह्या अकबर खानला नौदल तसेच हवाईदलाची मदत देण्यात आली होती. ह्यावरून पाकिस्तान बलुचिस्तानाला कुठल्याही परीस्थितीत पाकिस्तानात समाविष्ट करून घेण्यासाठी हपापलेले होते असे लक्षात येते. मुळात पाकिस्तानची निर्मितीच अशा विविध प्रांतांचे लचके तोडून व मुस्लीम व स्वतंत्रयुक्त मुस्लीम लीगच्या नेत्यांची सत्तेची हाव पूर्ण करण्यासाठी झालेली होती असे म्हणणे वावगे ठरू नये. अशा फुटिरवादी नेत्यांमध्ये मोहम्मद अली जिनांचा (जिन्नाह) नंबर सर्वात वरचा होता. भारताच्या फाळणीचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते की, जिनांची (जिन्नाह) राजकीय महत्त्वाकांक्षा अवास्तव होती व त्यातूनच भारताच्या फाळणीचे रामायण घडले असे निदर्शनास येते. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच मुस्लीम लीगच्या नेत्यांनी मुस्लीम जनतेची दिशाभूल करून त्यांच्या भावनांशी खेळून त्यांचा राजकीय स्वार्थासाठी वापर केल्याचे जाणवते. जिनांसारख्या नेत्यांची पाकिस्तानसारखा देश निर्माण करण्याची इच्छा तर पूर्ण झाली; परंतु त्यांना व त्यांच्या राजकीय वारसांना हा देश 'घडविण्यास' अपयश आले आहे हे सत्य नाकारता येत नाही. लियाकत अली खान, आयुब खान, याह्या खान, झुल्फीकार अली भुत्तो, झिया-उल-हक, बेनझिर भुत्तो, परवेज मुशर्रफ, अश्फाक कयानी, सैय्यद युसुफ रझा गिलानी, नवाझ शरीफ अशा पाकिस्तानी लष्करशहांना व राजकारण्यांना पाकिस्तानातील आर्थिक व सामाजिक जीवन व एकंदरीतच रहाणीमानाचा दर्जा उंचावण्यात अपयश आलेले आहे. आजही

पाकिस्तानातील बहुसंख्य जनता गरिबी व दारिद्र्याने पिचलेली दिसते व अशा दारिद्र्यातून अफजल कसाबसारखे तरुण १ लाख रुपयांसाठी मुंबईत येऊन जीवाची पर्वा न करता अमानुषपणे निष्पाप लोकांना गोळ्या झाडून ठार मारताना दिसतात. पाकिस्तानातील या दयनीय परिस्थितीला पाकिस्तानी राजकारणी व लष्करशहाच पूर्णतः जबाबदार आहेत. ह्या लोकांनी पाकिस्तानातील लोकशाहीचे तीन-तेरा वाजवून टाकले आहेत. हा देश म्हणजे अतिरेकी संघटनांचे नंदनवन बनला आहे. येथील परिस्थितीचे चपलख वर्णन करावयाचे झाल्यास हिंदीतील 'अंधेर नगरी चौपट राजा' व मराठीतील 'आंधळं दळतंय व कुत्र पीठ खातंय' या म्हणींचा वापर करावा लागेल. ग्राम्य भाषेत वर्णन करायचे झाल्यास पाकिस्तानची स्वतःची परिस्थिती शेरडाच्या शेपटासारखी म्हणजेच 'अब्रू धड झाकता येत नाही व माशा धड मारता येत नाहीत' अशी असूनसुद्धा हा देश भारतावर अतिरेकी हल्ले करण्याचा व बलुचिस्तानातील जनतेवर जुलुम व अत्याचार करण्याचा आसुरी आनंद लुटताना दिसतो. पाकिस्तानच्या या पापकृत्यांमध्ये त्याचा जवळचा मित्र चीन त्याला साथ देत असतो असे निदर्शनास येते. कदाचित चीनच्या साम्यवादी राजकारण्यांना हिंदू पुराणांतील भस्मासुराची कथा माहीत नसावी. अन्यथा त्यांनी पाकिस्तानसारख्या देशाला फक्त भारताला विरोध करावा ह्या उद्देशाने सर्वतोपरी मदत केली नसती. चीनच्या ह्या धोरणांचाच एक भाग म्हणून चीन बलुचिस्तानात मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक करीत आहे. आपण अगोदर पाहिलेच आहे की, बलुचिस्तानातील जनतेचा चीनच्या ह्या उपद्व्यापांना कडवा विरोध आहे. पाकिस्तानने बलुचिस्तानच्या दक्षिण किनाऱ्यावरील ग्वदार हे बंदर चाळीस वर्षांच्या कराराने चीनला विकसीत करण्यासाठी दिले आहे. चीनचे पाकिस्तान प्रेम जरी सध्या ओसंडून वाहत असले तरी त्यांना ठाऊक नाही की, हा दहशतवादाला खतपाणी घालणारा भस्मासुरी देश चीनवर कधीही उलटू शकतो व पाकिस्तानात प्रशिक्षण घेणारे अतिरेकी चीनच्या भूमीवर केव्हाही हल्ले करू शकतील ही शक्यता नाकारता येत नाही. यासाठी फक्त चीन व पाकिस्तानमध्ये थोड्या प्रमाणात कटूता येण्याचा अवकाश आहे. जरी सध्या चीन व पाकिस्तानचे 'चिनी-पाकिस्तानी भाई भाई' प्रकारचे प्रेम ओतप्रोतपणे भरून वाहत असले तरी भविष्यात ह्या उभय देशांमधले संबंध असेच राहतील हे सांगता येत नाही. चीनने 'हिंदी-चिनी भाई भाई' ह्या नाऱ्याला १९६२ साली भारतावर आक्रमण करून कशाप्रकारे मूठमाती दिली हा इतिहास सर्वश्रूत आहे. निदान १९६२ पूर्वी चीनचा नसला तरी भारताचा हेतू तरी चीनबरोबर खरोखरच मैत्रीपूर्ण व सौहार्दपूर्ण संबंध राखण्याचा होता. परंतु पाकिस्तानची सध्याची चीनसोबतची मैत्री पूर्णतः स्वार्थासाठी व शत्रूचा (येथे भारत वाचावे) शत्रू तो आपला मित्र ह्या तत्त्वानुसार सुरू आहे. चीनला पाकिस्तानला भारताविरुद्ध वापरून तेथील साधनसंपत्तीचे शोषण करावयाचे आहे व पाकिस्तानच्या भूमीचा व बंदरांचा वापर चीनचा जागतिक व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने करावयाचा आहे हे सत्य लपून राहिलेले नाही. ग्वदार व कराची सारखी बंदरे चीनशी लोहमार्गाने जोडण्यामागचा चीनचा मूळ उद्देशच हा आहे. ह्या बंदरांमुळे चिनी मालाला आखाती देश, आफ्रिका व युरोपमध्ये पाठविण्यासाठी चीनच्या जहाजांना दक्षिण चीनचा समुद्र व हिंद महासागरातून दूरचा प्रवास करावा लागणार नाही. त्यामुळे चीनचा वेळ व इंधन खर्चसुद्धा मोठ्या प्रमाणावर वाचणार आहे. मूर्ख पाकिस्तानी राज्यकर्त्यांना चीनचा हा डाव लक्षात येत नाही एवढे ते दुधखुळे खचितच नाहीत. परंतु तो डाव लक्षात येत नसल्याचे सोंग मात्र ते घेत आहेत व याला एकच गोष्ट कारणीभूत आहे व ती म्हणजे पाकिस्तानला भारताविषयी असलेला उच्चकोटीचा व अनाठायी द्वेष ही होय. जर पाकिस्तानने भविष्यात एखाद्या विशिष्ट कारणामुळे चीनला विरोध करण्याचा प्रयत्न केला तर चीन बाल्टिस्तान म्हणजेच पाकव्याप्त काश्मीरपासून ते थेट सिंधपर्यंत त्या देशाची 'वाट' लावेल यात वाद

सल्लामसलतीचा विश्वास हा माणसामाणसांतील सर्वश्रेष्ठ विश्वासाचा पुरावा आहे. - चीनमधील एक म्हण

नाही. अर्थात, बल्टिस्तान–गिलगिट व एकंदरीतच संपूर्ण पाकव्याप्त काश्मीर हा भारताचाच भाग असून पाकिस्तानने बेकायदेशीररित्या ह्या भागांवर कब्जा केलेला आहे याचा उल्लेख आपण अगोदर केलाच आहे. त्याचप्रमाणे पाकिस्तानला भविष्यात चीनने काही कारणामुळे दुखावले तर पाकिस्तान ज्याला इंग्रजीत Trusted and Tried म्हणजेच विश्वासार्ह व परिणामकारकरित्या वापरलेला असा आपला 'फॉर्मुला' म्हणजेच तंत्र चीनविरुद्ध वापरण्यास कचरणार नाही यात वाद नाही व हे तंत्र म्हणजे अर्थातच पाकिस्तानातून चीनमध्ये दहशतवादाची निर्यात हे होय! शेवटी चीनने विसरता कामा नये की, त्याच्या वायव्य प्रांतातसुद्धा (झिनजियांग – Xinjiang) मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे व चीनने तेथील जनतेवर त्यांची मुस्कटे दाबून नियंत्रण ठेवले आहे. शेवटी आपण मराठीत म्हणतो की, 'जे पेराल ते उगवेल', अगदी ह्या उक्तीप्रमाणे चीन व पाकिस्तानच्या मैत्रीचा अंत वा अस्त होऊ शकतो. परंतु म्हटले जाते की, कोणतीही गोष्ट घडण्यासाठी एक विशिष्ट वेळ यावी लागते व ती वेळ ह्या दोन स्वार्थी मित्रांवर भविष्यात येऊ शकते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सध्या पाकिस्तानच्या बलुचिस्तानातील अत्याचारी कृत्यांमध्ये चीन प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहभागी आहे यात वाद नाही.

पाकिस्तान सरकार बलुचिस्तानातील राष्ट्रीय चळवळ मोडून काढण्यासाठी बळाचा व लष्कराचा वापर पदोपदी करत असते यात वाद नाही. पाकिस्तानी लष्कर, आय.एस्.आय. (पाकिस्तानची गुप्तहेर संघटना) व फ्रंटीअर कोअर हे निमलष्करी स्वरूपाचे दल बलुचिस्तानच्या लष्करी कारवाईत आघाडीवर असते. बलुचिस्तानच्या जनतेच्या म्हणण्यानुसार तेथे पाकिस्तानी लष्कर दरवर्षी हजारो बलुत जनतेचा खातमा करत असते. बलुचिस्तानात पाकिस्तानी लष्कराने चालवलेल्या ह्या कारवायांविषयी वाचले असता जणू पाकिस्तानला सर्व बलुच लोकांना ठार करून तेथील बलुच वंशाचा संपूर्ण नाश करावयाचा आहे की काय असे वाटते. पाकिस्तानच्या या कारवाईची तुलना १९९० च्या दशकात युगोस्लाविया या पूर्व युरोपातील देशाचे तत्कालीन शासक स्लोबोडन मिलोसेविक यांनी तेव्हा त्या देशातील बोस्नियन मुस्लीमांविरुद्ध केलेल्या कारवाईविरुद्ध करणे योग्य ठरेल. एवढेच काय, पाकिस्तानच्या बलुचिस्तानातील या कुकर्मांची तुलना १९३० च्या दशकात जर्मनीच्या हिटलरने त्या काळात तेथील ज्यूंना ठार मारण्याची व मानवतेला काळीमा फासवणारी जी मोहीम उघडली होती, त्या मोहिमेसोबत  केल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

आय.एस्.आय. ही पाकिस्तानची गुप्तहेर संघटना तर एवढी पाताळयंत्री आहे की, ही संघटना बलुचिस्तानातील अनेक कार्यकर्त्यांना 'गायब' करत असते असा तिच्यावर आरोप आहे. एखादी बलुच व्यक्ती बलुचिस्तानच्या समस्येविषयी आवाज उठविण्याचा प्रयत्न करत असेल वा बलुच स्वातंत्र्य चळवळीसाठी काम करत असेल असा संशय आला तरी ही संघटना अशा व्यक्तींना बेपत्ता करण्याचे काम करत असते. असे बेपत्ता झालेले लोक अपवादानेसुद्धा आपल्या स्वगृही परत आलेले एकही उदाहरण जवळजवळ आढळत नाही. उलट अशा लोकांचे गोळ्यांनी छिन्नविछिन्न केलेले, सडलेले व अमानुषपणे विटंबना केलेले मृतदेह अनेकदा गटारांतून व निर्जन ठिकाणांहून सापडलेले आहेत. बलुच कार्यकर्त्यांना मारण्यापूर्वी त्यांचे डोळे काढणे, कान कापणे, डोके धडापासून वेगळे करणे व ते लपवून ठेवणे, केस काढून टाकणे, मूत्रपिंडे काढणे व त्यांची कातडी सोलणे इत्यादी क्रूरकृत्ये केल्याचे आढळते. अरविंद व्यं. गोखले यांनी आपल्या 'संघर्ष बलुचिस्तानचा' या पुस्तकात असे नमूद केले आहे की, बलुच कार्यकर्त्यांना ठार करून व त्यांची सालडी सोलून त्यावर 'पाकिस्तान झिंदाबाद' असे शब्द लिहिलेले असतात. असे काम पराकोटीचे

---

ज्याची आपण अपेक्षा करतो ते क्वचितच घडत असते. – बी. डिस्राएली

नराधमच करू शकतात यात वाद नाही. बलुच जनता आपल्यावर होणाऱ्या अन्यायावरची व या बेपत्ता प्रकरणांची फिर्याद पाकिस्तानच्या न्याय व्यवस्थेकडे करत असतानाचे दारुणचित्र दिसत असते. तेथील सरकारी यंत्रणेपुढे पाकिस्तानी न्याय व्यवस्थादेखील हतबल असल्याचे चित्र समोर येते. एवढेच काय, तेथील न्याय व्यवस्थेला देखील भ्रष्टाचाराने ग्रासलेले दिसते. परंतु याला पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन सरन्यायाधीश इफ्तिकार मुहम्मद चौधरी (हे २००५ ते २०१३ या काळात पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश होते) यांचा अपवाद करावा लागेल. माननीय इफ्तिकार मुहम्मद चौधरी यांनी पाकिस्तानचे तत्कालीन लष्करशहा जनरल परवेझ मुशर्रफ (२००१ ते २००८) तसेच त्यानंतर पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी अशा प्रबळ व्यक्तिंना देखील धारेवर धरलेले आढळते. जेव्हा खुद्द त्यांच्यासमोर बलुच बेपत्ता झालेल्या नागरिकांची फिर्याद आली तेव्हा सरन्यायाधिशांनी पाकिस्तान सरकारला ही बाब गांभीर्याने घेऊन तातडीने अशा नागरिकांना शोधून काढण्याचे व हा प्रश्न तडीस नेण्याचे आदेश दिले होते. माननीय चौधरी यांनी पंतप्रधानांपासून पाकिस्तानच्या शासकीय यंत्रणेतील इतर अनेक महत्त्वाच्या व्यक्तिंना आदेश देऊन आपल्या न्यायालयासमोर उभे राहण्यास भाग पाडले होते. माननीय इफ्तिकार मुहम्मद चौधरी यांच्या सरन्यायाधीश पदाच्या कालावधीचे अवलोकन केल्यावर तो पाकिस्तानातील न्यायव्यवस्थेचा 'सुवर्णकाळ' होता असे म्हणावे लागेल. मात्र, पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान सैयद युसुफ रझा गिलानी यांची मजल नंतर सरन्यायाधीशांना उर्मट उत्तरे देण्यापर्यंत गेली होती. याचा उल्लेख अरविंद व्यं. गोखले यांनी आपल्या 'संघर्ष बलुचिस्तानचा' या पुस्तकात केला आहे. गोखल्यांनी आपल्या या पुस्तकात; युसूफ रझा गिलानी यांनी अक्षरशः मस्तवालपणे सर्वोच्च न्यायालयाविरुद्ध जे उद्गार काढले होते ते उद्गार दिलेले आहेत. हे उद्गार पुढीलप्रमाणे आहेत – 'आप हमें कोई भी सजा दे सकते है, लेकिन इस हाऊस से निकाल तो नहीं सकते'. या उद्गारांवरून पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांच्या मनात तेथील न्यायव्यवस्थेविषयी थोडासाही आदर नसलेला जाणवतो. या वाक्यावरून तुम्ही काहीही आदेश द्या व आम्ही नॅशनल असेंब्लीमध्ये (भारताच्या लोकसभेप्रमाणे पाकिस्तानच्या संसदेचे कनिष्ठ दालन) कायदा करून वा एक साधा प्रस्ताव किंवा ठराव पारित करून न्यायालयाचा निर्णय रद्दबादल ठरवू असेच गिलानी न्यायालयास निक्षून सांगत नव्हते ना अशी शंका येते. माननीय सरन्यायाधीश चौधरी हे स्वतः बलुचिस्तानचे असल्यामुळे ते जाणूनबुजून बलुच लोकांच्या बाजूने पक्षपात करत आहेत अशी हीन वा खालच्या पातळीची टीका देखील पाकिस्तान सरकार धार्जिण्या लोकांनी केलेली आढळते. बलुचिस्तानच्या जनतेचे नेहमीच असे म्हणणे राहिले आहे की, पाकिस्तानच्या इतर प्रांतांतून बलुचिस्तानात बदली होऊन आलेले पोलीस अधिकारी बलुच जनतेवर अनेकदा बेकायदेशीररित्या कारवाई करताना व छळ करताना आढळतात. चौधरी यांनी जेव्हा पाकिस्तान सरकारतर्फे इतर प्रांतांमधील किती पोलीस अधिकाऱ्यांची बलुचिस्तानात बदली करण्यात आली आहे असा प्रश्न विचारला तेव्हा गिलानी सरकारच्या रागाचा पारा खूप चढला होता. त्यावेळी पोलीस अधिकाऱ्यांच्या एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतात बदली करण्याचा अधिकार देखील सरकारला नाही काय? असा उद्दाम प्रतिसवाल सरकारने न्यायालयाला केला होता. माननीय चौधरी यांनी त्यांच्या सरन्यायाधीशपदाच्या कारकीर्दीत पाकिस्तानातील न्यायव्यवस्थेला प्रतिष्ठा मिळवून दिली होती यात वाद नाही. श्री. चौधरी यांनी पाकिस्तानचे सरन्यायाधीश होण्यापूर्वी बलुचिस्तानच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून काम केलेले होते. त्यामुळे त्यांना पाकिस्तान सरकारने बलुचिस्तानात जो नंगानाच चालवला होता याची कल्पना असणारच यात वाद

नाही. परंतु त्यामुळे त्यांनी पक्षपातीपणा केला असे म्हणणे अत्यंत चुकीचे ठरेल. एका अर्थाने पाकिस्तानातील राजकारणी लोक त्यांच्या देशाच्या राज्यघटनेने जी न्यायव्यवस्था उभी केली आहे व त्या न्यायव्यवस्थेला जे अधिकार दिले आहेत त्यावरच प्रश्नचिन्ह उभे करत असल्याचे दृश्य नजरेस पडते. न्यायिक दृष्टी असलेले माननीय इफ्तिकार मुहम्मद चौधरी व नखशीखांत भ्रष्टाचाराने बरबटलेली पाकिस्तानी शासकीय यंत्रणा यांच्यातील या वादाची परिणती परवेज मुशर्रफ यांनी श्री. चौधरी यांना सरन्यायाधीश पदावरून बडतर्फ करण्यात झाली. ९ मार्च २००७ रोजी लष्करशहा जनरल परवेज मुशर्रफ यांनी मुहम्मद चौधरी यांना आपल्या पदाचा राजीनामा देण्यास सांगितले. परंतु श्री. चौधरी यांनी त्यास ठाम विरोध केला. त्यामुळे १२ मार्च २००७ रोजी मुशर्रफ यांनी श्री. चौधरी यांची पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदावरून गच्छंती केली. मात्र, इफ्तिकार मुहम्मद चौधरी हे चुपचापपणे अन्याय सहन करणाऱ्यांपैकी नव्हते. त्यांनी मुशर्रफ यांच्या या बेकायदेशीर कृत्यांविरुद्ध इस्लामाबाद ते कराची असा 'लाँगमार्च' काढला होता. या लाँगमार्चचा उद्देश मुशर्रफ यांच्या बेकायदेशीर व बेजबाबदार वर्तनाचा निषेध करणे हा होता. वाचकांना येथे सांगावेसे वाटते की, इस्लामाबाद हे शहर म्हणजे पाकिस्तानची राजधानी होय व कराची हे शहर पाकिस्तानातील दक्षिणेकडील सिंध या प्रांतातील अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेले शहर आहे. कराची हे पाकिस्तानचे व्यापाराच्या दृष्टीने फार मोठे बंदर आहे. पाकिस्तानचा बहुतांश आंतरराष्ट्रीय व्यापार कराची बंदरातूनच चालतो. त्यामुळेच अगोदर नमूद केल्याप्रमाणे चीनच्या वायव्य भागातून गिलगिट-बाल्टिस्तान म्हणजेच पाकव्याप्त काश्मीरमध्ये जाणारा व तेथून पुढे सिंधमध्ये कराची व बलुचिस्तानातील ग्वदार या बंदरांपर्यंत जाणारा महामार्ग बांधण्याचे मनसुबे चीन रचत आहे. किंबहुना असे म्हटले जाते की, चीनने या महामार्गाचे बरेच काम पूर्ण केले आहे. ह्या महामार्गाप्रमाणेच (चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरीडॉर) चीनला याच धर्तीवर पाकिस्तानातील या दोन शहरांना व चीनला जोडणारा लोहमार्ग देखील बांधावयाचा आहे. हा महामार्ग व लोहमार्ग पूर्ण झाल्यावर चीनला आपल्या वस्तू व माल कराची व ग्वादार या बंदरांतून पश्चिमेकडे पाठविणे सोपे जाईल हे आपण पाहिलेच आहे. सध्या जरी चीनला पाकिस्तान आपला मित्र असल्याची अनुभूती होत असली तरी लवकरच पाकिस्तान कशाप्रकारे दहशतवादाचा पुरस्कार करणारे धोकादायक राष्ट्र आहे याची प्रचीती चिनी लोकांना आल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकेसारख्या प्रबळ राष्ट्राला याची सध्या जाणीव झालेली आढळते. त्यामुळेच जरी एकेकाळी अमेरिकेला पाकिस्तान आपला खूप जवळचा मित्र वाटत असला तरी सद्यस्थितीत अमेरिकेला पाकिस्तानचे खरे रूप लक्षात आलेले जाणवते. त्यामुळेच अमेरिकेचे अनेक सीनेटर्स (अमेरिकेच्या संसदेला 'काँग्रेस' असे म्हटले जाते व अमेरिकन काँग्रेसची दोन दालने आहेत. वरिष्ठ सभागृहाला वा दालनाला 'सीनेट' तर कनिष्ठ सभागृहाला 'हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्ज' असे संबोधले जाते. सीनेटच्या सदस्यांना वा खासदारांना 'सीनेटर्स' म्हणतात तर हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्जच्या सदस्यांना 'रिप्रेझेन्टेटिव्ज्' असे संबोधले जाते. अमेरिकेने संसदेच्या सीनेट या वरिष्ठ सभागृहाला अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणांबाबत व नीतींबाबत या देशाच्या राज्यघटनेचे अनेक अधिकार दिलेले आहेत. त्यामुळेच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी ठरवलेल्या परराष्ट्रीय धोरणांना /नीतींना व निर्णयांना सीनेटने मंजूरी देणे आवश्यक असते. हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्ज् ह्या सभागृहाला भारताच्या लोकसभेप्रमाणे महसूल वाढविण्याबाबतचे म्हणजेच आर्थिक बाबींविषयक अधिकार असून राष्ट्राध्यक्षीय निवडणूकीत जर उमेदवाराला 'इलेक्टोरल कॉलेजचे' बहुमत मिळाले नसेल तर अशा परिस्थितीत अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष निवडण्याचा देखील अधिकार आहे.) पाकिस्तान या देशाचा उल्लेख 'दहशतवादी व

दुःख झाले असताना चिंता करत बसल्याने दुःख दुप्पट होते. - डिफो

दहशतवादाला खतपाणी तसेच जगाच्या पाठीवर कार्यरत असलेल्या अनेक मुस्लिम दहशतवादी संघटनांना आश्रय देऊन आपल्या भूमीचा वापर दहशतवाद्यांना प्रशिक्षण देण्याकरिता निसंकोचपणे करू देणारा देश' असा करताना आढळतात. पाकिस्तान म्हणजे जगभरातील दहशतवादी संघटना व दहशतवाद्यांसाठीचे नंदनवन आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अमेरिकेच्या इतिहासात ९/११ चा भीषण दहशतवादी हल्ला घडवून आणणाऱ्या अल-कायदा या कुप्रसिद्ध दहशतवादी संघटनेचा प्रमुख नेता - ओसामा-बिन-लादेन हा क्रूर अतिरेकी २०११ साली पाकिस्तानातील अबोटाबाद या शहरात सापडला होता. अमेरिकेने आपल्या विशेष सैन्यदलाला (कमांडोंना) तेथे पाठवून त्याला ठेचले होते वा ठार केले होते. ओसामा-बिन-लादेन अबोटाबादमध्ये सापडणे म्हणजे पाकिस्तानच्या दहशतवादाला सक्रिय पाठिंबा असणाऱ्या कृत्यांचे व धोरणाचे द्योतक होय. अमेरिकेचे सध्याचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना पाकिस्तानचे व चीनचे देखील खरे रूप चांगलेच उमजलेले दिसते. ही बाब भारताच्या दृष्टीने निश्चितच स्वागतार्ह आहे. असो. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, श्री. इफ्तिकार मुहम्मद चौधरी यांनी इस्लामाबाद ते कराची हा लाँगमार्च काढून मुशर्रफ यांच्या सरकारचा निषेध नोंदवला होता. इस्लामाबाद ते कराची हे अंतर जवळजवळ १५०२ कि.मी. एवढे आहे. श्री. चौधरी यांच्या पाकिस्तान सरकार विरुद्धच्या या लढ्याला अनेक सुजाण व बुद्धिजीवी नागरिकांनी त्या काळात पाठिंबा दिल्याचे आढळते. त्यामुळे मुशर्रफ यांना या जनतेच्या मागणीपुढे आपली मान तुकवावी लागली होती व आपल्या मर्जीविरुद्ध श्री. चौधरी यांची पाकिस्तानचे सरन्यायाधीश म्हणून फेरनियुक्ती करावी लागली होती. माननीय इफ्तिकार मुहम्मद चौधरी हे किती कर्तव्यदक्ष न्यायाधीश होते याची कल्पना अरविंद व्यं. गोखले लिखित 'संघर्ष बलुचिस्तानचा' या पुस्तकातील खालील उताऱ्यावरून येते.

''बलुचिस्तानचे पोलीस प्रमुख, क्वेट्टाचे मुख्य सचिव आणि 'फ्रन्टीयर कॉन्सटिब्युलरी'चे प्रमुख यांनी येत्या दोन आठवड्यांमध्ये या बेपत्ता असलेल्या जनतेविषयी न्यायालयास माहिती द्यावी, न्यायालयात येण्याचे त्यांच्या अंगी धाडस नसले तरी न्यायालयाला योग्य ती माहिती देण्याचे त्यांचे कर्तव्य आहे आणि त्यात ते चुकारपणा करत आहेत तो खपवून घेतला जाणार नाही. त्याचबरोबर मुख्यमंत्री आणि गव्हर्नर यांनी राज्यात शांतता आणि सुव्यवस्था कशी राहील हे पाहिले पाहिजे. आमच्या हाती घटनेने अधिकार दिले आहेत आणि ते कसे वापरायचे ते आम्हाला चांगले कळते.''

माननीय इफ्तिकार मुहम्मद चौधरी यांनी वरील भाषेत सरकारी वकिलाला सरकारी यंत्रणांच्या जबाबदारीचे भान करून देण्यासाठी खडसावले होते. वाचकांना येथे आवर्जून सांगावेसे वाटते की त्यांनी अरविंद व्यं. गोखले लिखित 'संघर्ष बलुचिस्तानचा' हे पुस्तक जरूर वाचावे. हे पुस्तक पुण्याच्या श्री. गंधर्व वेद प्रकाशन ह्या प्रसिद्ध प्रकाशन संस्थेने मे २०१७ मध्ये प्रकाशित केले आहे. अरविंद व्यं. गोखले हे पेशाने पत्रकार असून ते पाकिस्तान विषयीचे भारतातील 'जानेमाने' अभ्यासू तज्ज्ञ मानले जातात. श्री. गोखले यांनी अनेक ग्रंथ लिहिलेले असून ते सर्वच वाचनीय आहेत.

बलुच माणसांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी अजून काही सांगावयाचे झाल्यास असे म्हणावे लागेल की, बलुच व्यक्तिला आपल्या संस्कृतीचा रास्त अभिमान असल्याचे आढळते. बलुच लोक आपली संस्कृती पाकिस्तानच्या संस्कृतीपेक्षा वेगळी आहे असे मानतात. त्यामुळे पाकिस्तानच्या कुकर्मांविरुद्ध आपण आवाज उठवला नाही तर आपली संस्कृती व परंपरा नष्ट पावेल असे बलुच लोकांना वाटते. पाकिस्तान सरकारची कृत्ये पाहून त्यांची ही भावना योग्यच आहे असे म्हणावे लागेल. बरेच बलुची लोक इस्लामच्या सुन्नीपंथाचे असून काही

बलुच लोक शियापंथाचे देखील आहेत. बलुच पुरुषाचा कल ढगळा पोशाख घालण्याकडे असतो. ते मनगटापर्यंत लांब सदरा घालतात व त्यांच्या डोक्यावर फेटा असतो. बलुची स्त्रियांचा पोशाख देखील ढगळाच असतो व त्यांच्या कपड्यांवर बारीक आरसे देखील बसवलेले असतात. त्याचप्रमाणे त्यांना सर्वच स्त्रियांप्रमाणे दागदागिन्यांची देखील हौस असलेली आढळते. परंतु बलुचिस्तानातील लोक आपल्या धार्मिक व एकंदरीतच वागणुकीत मोठ्या प्रमाणात उदारमतवादी असल्याचे जाणवते. तसेच, बलुच माणूस पाकिस्तान सरकारच्या बिनडोक योजनांची टर उडवण्यात मागे पुढे पाहत नाहीत. याचे ठळक उदाहरण म्हणजे मकरान (मकरन) विभागात दाष्त नदीवर पाकिस्तान सरकारने बांधलेले १२७ फूट उंचीचे धरण होय. असे म्हटले जाते की पाकिस्तान सरकारने हे धरण बांधण्यासाठी ५८७ कोटी रुपये खर्च केले व ते धरण बांधत असताना असे सांगण्यात येत होते की, या धरणातील पाण्यामुळे ३३ हजार २०० एकर एवढी शेतजमीन भिजवनीखाली येईल. हे धरण बांधण्यासाठी पाकिस्तान सरकारने स्थानिक लोकांकडून जवळजवळ १९०३८ एवढी जमीन संपादीत केली होती व प्रत्यक्षात ५०० एकर एवढ्याच जमिनीला या धरणातून पाणी मिळत होते. त्यामुळे बलुचिस्तानात पाकिस्तान सरकारने बांधलेले हे अजब धरण म्हणजे चेष्टेचा व विनोदाचा विषय बनले आहे. तसेच या धरणाचा जास्तीत जास्त फायदा सिंध प्रांतातील शेतकऱ्यांनाच झाला आहे व पाकिस्तान सरकारने एकप्रकारे बलुच लोकांचा याबाबतीतसुद्धा विश्वासघात केला आहे अशा आशयाची भावना बलुच जनतेच्या मनात असलेली जाणवते. बलुचीस्तानात बुग्ती व मेंगल या मूळच्या प्रमुख जमाती आहेत.

बलुचिस्तान व महाराष्ट्र यांचा एक अनोखा संबंध आहे. हा संबंध म्हणजे बलुचिस्तानात मूळचे मराठी असलेले अनेक लोक येथे पिढ्यान्‌पिढ्या राहत असल्याचे आढळते. येथील या मराठी कुटुंबांचा संबंध १७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या लढाई सोबत आहे. आपल्या सर्वांना माहीतच आहे की, १७६१ साली अफगाण आक्रमणकर्ता अहमद शहा अब्दाली याने उत्तर भारतावर आक्रमण केले होते. अहमदशहा अब्दाली पर्शियाचा सम्राट नादिर शहा याच्या मृत्यूनंतर (याची हत्या झाली होती) अफगाणिस्तानचा शासक बनला होता. मराठ्यांची उत्तर भारतातील वाढती ताकद अहमदशहा अब्दाली व त्याचा हिंदुस्तानातील बगलबच्चा नजीबउद्दौला यांना खूपत होती. त्यामुळे अहमदशहा अब्दाली १७६१ साली उत्तर भारतावर आक्रमण करून आला होता. त्यावेळेस तत्कालीन पेशवे बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांनी सदाशिवराव भाऊ यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे मोठे सैन्य अहमद शहा अब्दाली विरुद्ध लढण्यासाठी दिल्लीच्या दिशेने पाठवले होते. या सैन्यात बाळाजी बाजीरावांचा पुत्र विश्वासराव हा सुद्धा होता. दुर्दैवाने पानिपतच्या ह्या तिसऱ्या लढाईत मराठ्यांच्या सैन्याचा दारूण पराभव झाला व अनेक शूर मराठे रणांगणावर धारातिर्थी कोसळले. यात खुद्द सदाशिवराव भाऊ व विश्वासराव यांचासुद्धा समावेश होता. अब्दालीने या लढाईत व लढाईनंतर देखील अनेक सैनिकांचा (शूर योद्ध्यांचा) व सामान्य लोकांचा अमानुषपणे खातमा करून आपल्या क्रौर्याचे दर्शन घडवले होते. असे म्हटले जाते की, मल्हारराव होळकरांच्या धोरणीपणामुळे (शिष्टाईमुळे) कोंडीत सापडलेले व मृत्यूच्या दाढेत अडकलेले अनेक मराठा सैनिक (शूर योद्धे) व सदाशिवराव भाऊंची पत्नी पार्वतीबाई बाहेर पडू शकले होते. परंतु लढाईतून वाचलेल्या सर्वच मराठी सैनिकांना वा योद्ध्यांना शत्रूच्या तावडीतून निसटता आले नाही व अब्दालीने अनेक मराठी योद्ध्यांना युद्धबंदी बनवले. त्याचा मानस या मराठा युद्धकैद्यांना अफगाणिस्तानात घेऊन जाण्याचा होता. अहमद शहा अब्दाली

---

बलुचिस्तानातून बोलन खिंडीच्या मार्गाने अफगाणिस्तानला परतणार होता. तो जेव्हा बलुचिस्तानात पोहोचला तेव्हा त्याच्या लक्षात आले की हे मराठा युद्धकैदी अतिशय अशक्त झाले आहेत व त्यांना एकत्र ठेवणे त्याच्या दृष्टीने धोकादायकसुद्धा ठरू शकते. याचाच अर्थ असा की अहमद शहा अब्दालीला भीती वाटली की हे शूर मराठा योद्धे पलटवार करून त्याच्यावर तुटून पडू शकतील. त्यामुळे त्याने हे मराठा युद्धकैदी बुग्ती, मर्री, मझारी, रायसाली, बुल्चानी आदी बलुच जमातींमध्ये वाटून टाकले वा विकले असे अभ्यासक म्हणतात. आज जवळजवळ २५६ वर्षांपासून या मराठ्यांच्या वंशजांच्या अनेक पिढ्या बलुचिस्तानात राहत आहेत. कालपरत्वे या मूळच्या हिंदू असलेल्या मराठ्यांना तेथील मुस्लिम धर्म स्वीकारावा लागला व सध्या ते बलुच भाषा बोलताना आढळतात. या मूळच्या मराठा असलेल्या बलुच लोकांना बलुचिस्तानात 'म्रता' म्हटले जाते. हे 'म्रता' लोक (मूळचे मराठा) सद्यस्थितीत बुग्ती व मर्री या लोकांसोबत राहत असल्याचे आढळतात. 'म्रता' हा मराठा या मराठी शब्दाचा बलुच उच्चार होय. हे मराठे लोक सध्या घरगुती नोकर म्हणून व इतर कष्टाची कामे करताना दिसून येतात. आज हे लोक बलुचिस्तानच्या मातीत व संस्कृतीत पूर्णपणे मिसळून गेलेले आढळतात. एकेकाळच्या शूर मराठ्यांचे हे दुर्दैवी वंशज गुलामाप्रमाणे जीवन व्यतित करीत होते. परंतु १९४४ पासून त्यांची परीस्थिती बदलत असल्याचे जाणवते. कारण या वर्षी मीर अहमद यार खान अहमदभाई बलुच ही व्यक्ती १९४४ साली मराठ्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरली असे म्हणतात. बलुचिस्तानातील मराठ्यांच्या एका गटाला साहू मराठा (शाहू मराठा) असे देखील म्हटले जाते. या साहू मराठ्यांना समाजात चांगला दर्जा असल्याचे जाणवते व हे लोक मोठ्या प्रमाणात शेती करत असल्याचे दिसते. येथे वाचकांना एक रोचक माहिति सांगाविशी वाटते व ती अशी की, २०१५ साली भारतात 'रॉय' (ROY) नावाचा एक हिंदी चित्रपट बनला होता व त्या चित्रपटातील –

'चिट्टीयाँ कलाइयाँ वे,
तू लई दे मेनू गोल्डन झुमके...
में कन्नाविच पावा चुमचुमके...'

हे गाजलेले गाणे जॅकलीन फर्नांडिस या अभिनेत्रीवर चित्रित करण्यात आले होते. ह्या गाण्याचे संगीत निर्देशक मीत ब्रदर्स होते तर हे गाणे कनिका कपूर ह्या गायिकेने गायलेले होते. हे गाणे भारतातील अजूनही एक लोकप्रिय चित्रपट गीत मानले जाते. परंतु फार कमी लोकांना हे ठाऊक आहे की या गाण्याची चाल बलुचिस्तानातील मराठ्यांच्या लोकगीतावर आधारित आहे. असो.

२००७ सालापासून व प्रामुख्याने जनरल परवेझ मुशर्रफ यांच्या कारकीर्दीपासून बलुचिस्तानची समस्या अजूनच चिघळलेली आहे. पाकिस्तान बलुचिस्तानातील आपल्या काळ्या कर्मांवर पांघरूण घालण्यासाठी भारताकडे बोट दाखविण्याचे उद्योग करत असल्याचे दिसते. पाकिस्तानच्या या काळ्या कारनाम्यांत त्या राष्ट्राला चीनचे समर्थन असल्याचे दिसते. पाकिस्तानच्या भारताविरोधी कुभांडांचे एक ताजे उदाहरण म्हणजे कुलभूषण जाधव या भारतीयाची पाकिस्तानी यंत्रणांनी ३ मार्च २०१६ रोजी केलेली अटक हे होय. कुलभूषण जाधव यांचा जन्म महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यात झालेला असून त्यांचे कुटुंबीय मुंबईतील पवई या उपनगरात राहतात. हे कुलभूषण जाधव हे भारतीय व्यावसायिक असून इराणमधील (इराण हा बलुचिस्तानचा पश्चिमेकडील शेजारी आहे) चबाहर या बंदरात त्यांचा व्यवसाय होता. श्री. जाधव यांना चबाहर येथून अटक करून त्यांना पाकिस्तानी यंत्रणांनी बलुचिस्तानात आणल्याचे म्हटले जाते. पाकिस्तानचे असे म्हणणे आहे की, जाधव हे भारताच्या 'रिसर्च अँड ॲनालिसीस विंग' ह्या गुप्तहेर संघटनेसाठी काम

सूक्ष्म छिद्रांतून जसा सूर्यप्रकाश जाणवतो, त्याप्रमाणे किरकोळ गोष्टींमुळेच माणसाचा स्वभाव कळतो. – एस. जॉनसन

करणारे गुप्तहेर आहेत. मात्र, पाकिस्तानचा हा धादांत खोटारडेपणा आहे. १० एप्रिल २०१७ रोजी पाकिस्तानच्या लष्करी न्यायालयाने कुलभूषण जाधव यांना मृत्यूदंड ठोठावला होता. परंतु भारत सरकारने पाकिस्तानच्या ह्या षडयंत्राविरुद्ध जोरदार आवाज उठवलेला होता. त्यामुळे पाकिस्तानला हे प्रकारण नेदरलँडस्‌मधील हेग स्थित आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे वर्ग करावे लागले आहे. कुलभूषण यांच्या बाजूने भारतातील प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ हरीश साळवे हे बाजू मांडताना दिसताहेत. १८ मे २०१७ रोजी आंतरराष्ट्रीय न्यायालयाने पाकिस्तानी लष्करी न्यायालयाने कुलभूषण जाधव यांना दिलेल्या मृत्यूदंडाच्या शिक्षेला स्थगिती दिली होती. मात्र, पाकिस्तान आंतरराष्ट्रीय न्यायालयाला खोट्या व बनावट चित्रफिती दाखवून प्रभावीत करण्याचा प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास येते. कुलभूषण जाधव प्रकरणात भारत सरकारने घेतलेली भूमिका निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. भारत सरकारच्या ह्या कणखर भूमिकेमुळे परदेशात वास्तव्य करून असणाऱ्या भारतीय नागरिकांमध्ये खरोखरच एक वेगळा आत्मविश्वास निर्माण होईल यात वाद नाही. जर परदेशात कोणी आपल्याला चुकीच्या प्रकरणांत गोवण्याचा प्रयत्न करत असेल तर कठीण परिस्थितीत भारत सरकार आपल्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहते असा संदेश भारत सरकारने संपूर्ण जगातील अनिवासी भारतीयांना दिला आहे.

२०१६ च्या १५ ऑगस्ट म्हणजेच भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बलुचिस्तानचा उल्लेख केला होता. बलुचिस्तानचा विषय जाहीरपणे ऐरणीवर मांडणारे ते भारताचे पहिले पंतप्रधान आहेत. नरेंद्र मोदींनी असे करून एक प्रकारे पाकिस्तानच्या भारतातील काश्मीरमध्ये नाक खुपसण्याच्या व तेथील दहशतवादाला खतपाणी घालण्याच्या काळ्या कृत्यांना लगाम घालण्याचा प्रयत्न केला आहे यात वाद नाही. कदाचित त्यामुळेच पाकिस्तान सद्यस्थितीत बिथरल्यासारखे वर्तन करताना आढळते. शेवटी पाकिस्तानने लक्षात ठेवले पाहिजे की, जो इतरांच्या घरावर दगड फेकण्याचे काम करतो तो स्वतःचे घर सुरक्षित ठेवू शकत नाही. पाकिस्तानने बलुचिस्तानात चालविलेल्या अत्याचारांची किंमत त्या देशाला भविष्यात नक्कीच मोजावी लागेल. भारतातील काश्मीरनामक नंदनवनात आग लावण्याचे व तेथील दहशतवादाला खतपाणी घालण्याचे काम पाकिस्तान १५ ऑगस्ट १९४७ पासूनच करत आलेले आहे. भारतासारख्या शांतताप्रिय देशाला जाणूनबुजून त्रास देणे व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची विनाकारण बदनामी करणे अशी निंदाजनक कृत्ये पाकिस्तान सततपणे करत असते. भारतातील दहशतवादाला खतपाणी घालणारा पाकिस्तान बलुचिस्तानातील जनतेलासुद्धा रोज नागवत आहे. बलुच जनतेच्या ह्या समस्येमध्ये अमेरिकेसारख्या प्रबळ राष्ट्रांनी व संयुक्त राष्ट्र संघटनेसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांनी लक्ष घालण्याची नितांत गरज आहे. असे झाल्यासच बलुचिस्तानचा प्रश्न सुटू शकेल. सरतेशेवटी, बलुचिस्तानच्या जनतेला पाकिस्तानकृत नरक-यातनांतून मुक्ती मिळो हीच प्रार्थना.

**संदर्भ :**

संघर्ष बलुचिस्तानचा : अरविंद व्यं. गोखले

बलोचिस्तान ॲट अ क्रॉस रोडस् : विल्यम मार्क्स व मार्क वाटरेलॉट

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

●●●

# लंडनचा प्रवास

*इ. स. २००४ पासून विद्या प्रसारक मंडळ नियमितपणे इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करीत आहे. मे २०१७ च्या सहलीत प्रतिक्षा राज्याध्यक्ष सहभागी झाल्या होत्या. त्यांनी सहलीतील आपले अनुभव या लेखात शब्दबद्ध केले आहेत. – संपादक*

लंडन, ऑक्सफर्ड आणि केंब्रीज ही एज्युकेशनसाठी प्रसिद्ध असलेली ठिकाणं. प्रत्येक शहराचं आपलं एक वैशिष्ट्य आहे. इंग्लंड या देशाने आपल्यावर १५० वर्षे राज्य केले. याचे खरे कारण आपल्याला या देशाला भेट दिल्यावर लक्षात येते. माझी ही शैक्षणिक सहल होती. ठाण्याच्या विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने ही सहल आयोजित करण्यात आली होती. दरवर्षी ही सहल आयोजित केली जाते आणि हा उपक्रम गेले १३ वर्षे सुरू आहे.

माझा प्रवास एक नवीन रोमांच होता माझ्यासाठी. पहिल्यांदा परदेशी प्रवास होता आणि तोही एकटीने करायचा होता. १८ मे रात्री २ वाजता जेट एअरलाईन्सचे विमान लंडनच्या दिशेने उडू लागले. प्रवास रात्रीचा होता. सकाळ झाली तेव्हा विमान इंग्लंड देशावर उडत होते. एक नवा देश, नवं हवामान आणि नवीन लोकं. विमानातून ग्रासलँड्स, बिल्डिंग्स, नद्या इत्यादी दिसत होत्या.

सकाळी ६:३० चा सुमारास मी हिथ्रो विमानतळावर उतरले आणि एका नवीन प्रवासाला सुरवात झाली. डॉ. बेडेकर आणि इतर सर्वजण मला इथे भेटले. डॉ. आगरकर, डॉ. जोशी आणि शाळेतील १५ मुले. अशा एकूण २१ जणांचा समावेश होता. हिथ्रो हे लंडन मधील सर्वात मोठे विमानतळ. इथून आम्ही बसचा प्रवास करून ऑक्सफर्डला पोहोचलो. साधारण २ तासांचा प्रवास होता. रस्त्यात सुंदर ग्रासलँड्स, टूमदार घरं पण दिसत होती. ऑक्सफर्ड हे इंग्लंड मधले एज्युकेशन साठी प्रसिद्ध असणारं एक ठिकाण. ऑक्सफर्ड शहरात बस शिरताच डॉ. बेडेकरांनी आम्हाला इथली माहिती द्यायला सुरुवात केली. एज्युकेशनच्या दृष्टीने इथे खूप वेगळ्या पद्धती वापरल्या जातात. शाळेच्या आणि महाविद्यालयाच्या इमारती खूप रूंद आहेत. इमारतीची बांधणी २ मजली आहे. त्यांना मोठे आवार आहे. प्रत्येक शाळेला एक प्रोटेक्टिव्ह वॉल म्हणजे कंपाऊंड आहे. हे बांधकाम १०० वर्षे जुनं आहे. पण ते खूप चांगल्या प्रकारे जपले आहे.



इथे डांबर रस्ते आहेत, पण त्यांना खड्डे नाहीत. ऑक्सफर्डला आम्ही YHA इथे राहिलो. आमचे वास्तव्य ३ दिवस होते. आम्ही आपले सामान ठेवले आणि आमचा भ्रमंतीला सुरवात झाली. आम्ही युनिव्हर्सिटी चर्च पाहिले. हे खूप जुने आहे आणि इथे वर्ग घेतले जात असत. आता इथे कॉलेजची पण उभारणी केली आहे. इथले एक वैशिष्ट्य असे की, कॉलेजचा भिंतीवर कुठलेही पोस्टर न लावता इथल्या सायंटिस्टचे नाव आणि ते कितीकाळ त्या कॉलेज किंवा युनिवर्सिटी मध्ये कार्यरत होते याची माहिती दिली आहे. त्यामुळे तुम्हाला येता–जाता त्या लोकांचं स्मरण राहते आणि प्रोत्साहन पण मिळतं. भारतात आपल्याला असे फार कमी दिसते. इथे कॉलेजेस संपूर्ण बंद आहेत म्हणजे

तीन बाजूने कॉलेजची इमारत आणि एका बाजूला प्रवेशद्वार. प्रत्येक कॉलेजला मोठे आवार आहे. इथे विद्यार्थ्यांना अभ्यास करायला दिले जाते. डॉ. बेडेकरांनी दिलेली माहितीही खूप छान होती आणि नवीन सुद्धा. डॉ. बेडेकरांचा यात खूप सखोल अभ्यास आहे. या टूरच्या माध्यमातून ते मुलांपर्यंत पोहोचविण्याचं काम करत आहेत. ही माहिती मुलांसाठी एक वेगळंच आकर्षण आणि चिकित्सा वृत्ती निर्माण करत होती. भारतात अशी शिक्षणपद्धत दिसून येत नाही. आपल्याकडे फक्त घोकंपट्टी असते. बोडलेइन लायब्ररिला आम्ही भेट दिली. इथे खूप जुने मॅन्युस्किप्ट आहेत. इथे जगभरातील लेखकांचे, साहित्यिकांचे, साइंटिस्टसचे लेख तुम्हाला पाहायला मिळतील. तीन दिवस या सुंदर वातावरणात गेलो आणि डॉ. बेडेकर आणि आगरकर यांच्या सहवासात आम्हाला ज्ञान मिळत होतं. पहिल्या दिवशी आम्ही बोडलेइन लायब्ररी, रॅडक्लिफ कॅमेरा आणि डिव्हिनिटी हॉल (दीक्षांत सभागृह) पाहिले. शाळेत आणि महाविद्यालयात असताना मी रॉबर्ट हूक आणि रॉबर्ट बॉयल यांचे नाव ऐकले आहे. एक जीवशास्त्राचे जनक व एक रसायनशास्त्राचे जनक. युनिव्हर्सिटी कॉलेज ऑक्सफोर्डचे हे विद्यार्थी. त्यांच्या स्मरणार्थ कॉलेजच्या भिंतीवर बोर्ड लावला आहे. बोडलेइन लायब्ररी एक जगप्रसिद्ध लायब्ररी आहे. इथे खूप जुने ग्रंथ मॅन्युस्किप्ट पाहायला आणि वाचायला उपलब्ध आहेत. जुन्या काळात विद्यार्थ्यांना डिग्री देण्यासाठी एक समारंभ आयोजित केला जायचा तो कॉंवोकेशन हॉलमध्ये केला जायचा. या हॉलची बांधणी आणि कोरीव काम अप्रतिम आहे. शैक्षणिक दृष्ट्या इथे मुलांना खूप संधी आहेत.

दुसऱ्या दिवशी आम्ही ऑक्सफर्ड इथे फिरणार होतो. इथे ॲशमोलियन संग्रहालय, बोटॅनिकल गार्डन हे मुख्य ठिकाण पाहायचे होते. ॲशमोलियन संग्रहालय खूप मोठे आहे. इथे वेगवेगळे विभाग आहेत. उदाहरणार्थ इंडिया, इजिप्त, इराक, सिरिया, इत्यादी. इथे ठेवलेल्या वस्तू ब्रिटिशांनी विकत घेतल्या आहेत किंवा त्या देशावर त्यांचे राज्य होते तिथून त्या आणल्या आहेत. हे संग्रहालय पाहायला फक्त टुरिस्टच नाही तर तिथले नागरिकसुद्धा येतात. मुलांना लहान वयातच या सर्वांची आवड आणि माहिती दिली जाते. भारतात कितीतरी संग्रहालय आहेत पण त्यांची काळजी कोणीही घेत नाही. लोकांना तिथे जायची इच्छापण नसते. म्हणजे आपणच आपल्या देशाचा अभिमान बाळगत नाही.



ऑक्सफर्ड नंतर आम्ही केंब्रीजला गेलो होतो. केंब्रीज म्हणजे विद्येची पंढरी म्हटली पाहिजे. अनेक विद्यापीठं इथे आहेत. इथल्या विद्यापीठात अनेक भारतीय शिकले आहेत. डॉ. होमी भाभा, रामाजुन इत्यादी. डॉ. आगरकर आणि डॉ. बेडेकरांनी आम्हाला इथे इतिहास आणि एज्युकेशनल सिस्टिम बद्दल माहिती दिली. भारतात पालक हे मुलाला शिक्षणाचं मार्गदर्शन करतात पण इंग्लंड मध्ये मुलांना कुठेही पालक मदत करत नाही. इथे मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न केले जातात. भारतात पुस्तकी ज्ञानाला आपण महत्त्व देतो. म्हणून मुलांना बाहेरचा जगात वावरताना थोडा त्रास होतो. केंब्रीज शहरात अनेक कॉलेजेस आहेत आणि प्रत्येकाचं एक वैशिष्ट्य आहे.

दोन दिवस आम्ही केंब्रीजला काही विद्यापीठं, अमेरिकन सिमेंटरी, कॅव्हेन्डिश लॅबोरेटरी पाहिली. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात या कॅव्हेन्डिश लॅबोरेटरी ने अनेक नवीन शोध लावले. आपल्या इथे मुलांना नॅशनल



लॅबोरेटरी कुठे आणि कुठल्या आहेत याची माहिती पण नसते. तर भेट देणं खूप दूरच राहिलं. त्यामुळे मुलांना सायन्सेस कोर्सेस बद्दल पूर्ण माहिती नाही आणि ते संशोधनाकडे वळत नाहीत.



ट्रीपचे शेवटचे काही दिवस लंडनमध्ये आम्ही फिरलो. लंडन ब्रीज, ट्रॅफलगर चौक, ब्रिटिश लायब्ररी, ब्रिटिश संग्रहालय, आणि चार्ल्स डार्विनचे घर ही काही ठिकाणं आम्हाला पाहता आली. शाळेत असल्यापासून आपण लंडन ब्रीजची कविता म्हणतो, हे एक उत्तम बांधकाम आहे आणि त्याची चांगल्या प्रकारे देखरेख केली जाते. ग्रीनविच भूमध्य रेखा, बिगबेन, लंडन आय, वेस्टमिन्स्टर पॅलेस इत्यादी आम्हाला पाहता आले. प्रत्येक ठिकाणी डॉ. बेडेकर आणि डॉ. आगरकरांनी तिथली हिस्टोरीकल माहिती दिली.



ब्रिटिश संग्रहालय पाहण्यासाठी एक दिवस पुरेसा नाही. जगभरातील अनेक वस्तू इथे पाहायला मिळतात. अनेक सोशल सायन्सेस शिकणारे विद्यार्थी, रिसर्चर्स इथे दिसून येतात. संग्रहालय मध्ये प्रवेश शुल्क नाही. ब्रिटिश लायब्ररी अजून एक मोठे आणि महत्त्वाचे ठिकाण. इथे तुम्हाला खूप जुनी आणि नवीन पुस्तकं, मॅन्युस्क्रिप्टस, जर्नल्स पाहायला मिळतील. आपल्या इथे मुलांना लायब्ररीत जायला फार कमी आवडते. मुलांना माहिती नसते पुस्तकांबद्दल, जर्नल्स इत्यादी. भारतातील मुलांचे पुस्तक वाचन कमी आहे आणि आता मोबाइलमुळे लिहिण्याची सवय देखील कमी झाली आहे. ख्रिस्ती मिशनरीजने भारतात शिक्षणाचे बीज पेरले आणि आता स्वतंत्र भारतात शिक्षणाची पद्धत ढासळत चालली आहे. शिक्षणाची पद्धत बदलली पाहिजे. पण या गोष्टींसाठी काही वेळ दिला पाहिजे. मुलांना आणि पालकांना प्युअर सायन्सेस आणि रिसर्च बद्दल माहिती दिली पाहिजे. एक जागरूकता निर्माण केली पाहिजे.



शेवटी इतकंच म्हणीन की आमचा प्रवास अतिशय चांगला झाला. डॉ. बेडेकर आणि डॉ. आगरकरांचे यासाठी मी आभारी आहे. डॉ. नितीन जोशी सर यांचे पण मी आभार मानते. या सर्वांसाठी मला पाठिंबा आणि मदत केली ते माझे आई, बाबा आणि भावाचे विशेष आभार मानते.

**– प्रतिक्षा राजाध्यक्ष**

•••

थोर ध्येय साध्य करण्यासाठी छोट्या गोष्टींचाही उपयोग होतो. – होरेस

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी थोरामोठ्यांची ओळख म्हणजेच 'ग्रेट-भेट' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुण्या सौ. नेहा वैद्य या उपस्थित राहिल्या होत्या. कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात सर्व पालकांना मार्गदर्शन केले. अभ्यासासाठी सतत मागे न लागता अभ्यासाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे, मुलांना सुशिक्षित बनविण्यासोबत सुसंस्कारीत बनवावे. जागतिक घडामोडी, जनरल नॉलेज वाढविण्याचा त्यांनी आग्रह केला. द्वितीय सत्रात 'विद्यार्थी मार्गदर्शनाचे' या भाषणात सर्व दहावीच्या विद्यार्थ्यांना 'दहावी बिनधास्त' या विषयावर मार्गदर्शन केले.
- लेझीमच्या तालावर 'गणपती आगमन' झाले. इ. १०वी अ व क च्या विद्यार्थिनींचा या लेझीम पथकात सहभाग होता.
- सन २०१७-१८ चा ब्राह्मण सेवा संघातर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार यंदा सौ. उज्ज्वला संजय धोत्रे यांना मिळाला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय



- दिनांक ११ ऑगस्ट रोजी महाविद्यालयामध्ये सुधारीत बाल गुन्हेगार कायद्यावर एक व्याख्यान ठेवण्यात आले होते. मुंबई येथील TISS येथे शोध प्रबंधाची विद्यार्थिनी व सामाजिक कार्यकर्ती कुमारी प्रेरणा महाजन यांनी सदर व्याख्यान घेतले.
- दिनांक १५ ऑगस्ट, २०१७ रोजी प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांनी डी. एम. हरीश मेमोरियल अभिरूप न्यायालय विद्यार्थ्यांची निवड केली. मनीष भोजवाणी, पलक गुप्ता व अंकित डिनडाळे यांची निवड करण्यात आली.
- दिनांक १८ ऑगस्टपासून द्वितीय व तृतीय विधीचे शिकवणी वर्ग सुरू करण्यात आले. या तारखेपर्यंत विद्यापीठातर्फे निकाल लावण्यात आलेले नसले तरी अभ्यासक्रम पूर्ण व्हावा या उद्देशाने सदर शिकवणी वर्ग सुरू करण्यात आले आहेत.
- ठाणे जिल्हा विधी सेवा केंद्र व वि. प्र. मं. चे ठाणे. नगरपालिका विधी महाविद्यालय मोफत विधी सहाय्यता केंद्र यांच्या मार्फत विद्यार्थ्यांनी दिनांक २३ ऑगस्ट रोजी ठाणे न्यायालयाच्या प्रांगणात लोक अदालतची माहिती देण्यासाठी पथनाट्य सादर केले. यावेळी अनेक माननीय न्यायाधीश, वकील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन



### विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनमधील ग्रंथालय सहाय्यक चंद्रकांत शिंगाडे युजीसी-सेट परीक्षा उत्तीर्ण

विद्या प्रसारक मंडळाच्या, तंत्रनिकेतनच्या ग्रंथालयात ग्रंथालय सहाय्यक म्हणून कार्यरत असणारे चंद्रकांत सुखदेव शिंगाडे यांनी दि. १६ एप्रिल २०१७ रोजी पुणे विद्यापीठ आयोजित युजीसी-सेट परीक्षा ६२.८५% गुण प्राप्त करून घवघवीत यश प्राप्त केले आहे.

श्री. शिंगाडे यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची पदवी (B.Lib & I.SC.) प्राप्त केल्यानंतर ते सन १९९७ मध्ये तंत्रनिकेतनात ग्रंथालय सहाय्यक म्हणून रुजू झाले होते. दरम्यान स्वर्गीय प्रा. मोहन पाठक सरांनी त्यांना 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात' पदवी करण्याचा सल्ला दिला व सन २००५-०६ साली वि. प्र. मंडळाचे बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक संचलित 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात' साठी प्रवेश घेतला व ६२% मिळवून उत्तीर्ण झाले.

श्री. शिंगाडे यांनी आपली स्वतःची नोकरी सांभाळून 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात' (B.Lib & I.SC.) पर्यंतचे शिक्षण घेतले व पुढे NET/SET तयारी करीत होते. यावर्षी दि. १६ एप्रिल २०१७ रोजी परीक्षा त्यांनी दिली होती. त्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यांना ६२.८५% गुण मिळाले आहेत व ही परीक्षा त्यांनी Qualified केली आहे.

माझ्या यशात सदैव वंदनीय आणि मला दिपस्तंभासारखे असणारे माझे आई-वडील की त्यांनी स्वतः काबाडकष्ट करून शिक्षण दिले. शिवाय कोल्हापूरला शिक्षणासाठी गेलो तेव्हा हॉस्टेलची फी भरण्यासाठी पैसे नव्हते तेव्हा त्यांनी आपल्या स्वतःच्या घरीच राहण्याची आणि जेवणाची सोय करून देणाऱ्या सौ. मंगल रघुनाथ वाघमोडे व श्री. रघुनाथ भीमराव वाघमोडे दांपत्य. सन १९९६-९७ साली मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात नोकरी करीत असताना माझी आस्थेवाईकपणे विचारपूस करून माझ्या अस्थिर जीवनाला स्थिरता प्राप्त करून देणारे व माझ्या M.Lib च्या प्रकल्पाचे मार्गदर्शक आदरणीय डॉ. प्रदीप कर्णिक सर.

'सदैव पुढे शिकत राहा' असा मौलिक सल्ला देणारे आणि माझ्या पुढील शिक्षणासाठी नेहमीच प्रोत्साहन देणारे व M.Lib चे माझे गुरू स्वर्गीय प्रा. मोहन पाठक सर व प्रा. नारायण बारसे सर, तंत्रनिकेतनचे माजी प्राचार्य आदरणीय एस. एस. मुजुमदार सर व प्राचार्य दि. कृ. नायक सर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'ग्रंथालये ही ज्ञानाची पाणपोई' आहेत आणि त्याकडे अत्यंत बारकाईने लक्ष देणारे आमच्या संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर सर. या सर्वांचा माझ्या यशात मोठा वाटा असल्याचे श्री. शिंगाडे आवर्जून सांगतात.

### विद्या प्रसारक मंडळाच्या, तंत्रनिकेतनमधील इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम तर्फे 'अक्षय ऊर्जा दिन' उत्साहात साजरा

दि. १९ ऑगस्ट २०१७ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम विभागातर्फे 'अक्षय ऊर्जा दिन' आयोजित करण्यात आला होता. या दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित केले होते. २० वी राष्ट्रीय परिषद दि. २२ डिसेंबर २०१७ रोजी इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम विभागाने आयोजित केली आहे. त्याचाच भाग म्हणून अक्षय ऊर्जा दिनाचे औचित्य साधून सदरची कार्यशाळा (Workshop) आयोजित करण्यात आली होती. दि. २२ डिसेंबर २०१७ रोजी नियोजित राष्ट्रीय परिषद ही

'Advancement n Renewable Energy Technology' संबंधी आहे.

सदर ‘अक्षय ऊर्जा दिन’ हा EPS विभागाद्वारे दि. १९ ऑगस्ट २०१७ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. ऊर्जा क्षेत्रात अक्षय ऊर्जा फार महत्त्वाची मानली जाते. त्यामध्ये ज्या नवनवीन घडामोडी आणि नवीन शोधांची लोकांना जाणीव करून देणे हे मुख्य उद्दिष्टे आहे. प्रत्येक वर्षी या विभागातर्फे हा दिन साजरा केला जातो. त्यामध्ये राज्य पातळीवरील निबंध सादरीकरण स्पर्धा, पोस्टर्स घोषवाक्य व अक्षय ऊर्जा संबंधीच्या विविध स्पर्धांचा समावेश असतो. यंदा या विभागाचे १२ वे वर्ष आहे.

विभागातर्फे (EPS) नियोजित राष्ट्रीय परीषद 'Advancement n Renewable Energy Technology' च्या अनुषंगाने सदरची कार्यशाळा आयोजित केली होती. सदरची कार्यशाळा तीन सत्रात पार पडली. ती सत्रे खालीलप्रमाणे. उद्‌घाटन सत्र –

सदर कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्रमुख पाहुण्या सौ. छाया भोसले (प्रमुख QA & I (विद्युत) टाटा पॉवर कंपनी लि. मुंबई) यांचे शुभहस्ते करण्यात आले. परिषदेचे आवाहक आणि प्राचार्य दि. कृ. नायक यांनी पुढे होणाऱ्या नियोजित राष्ट्रीय परिषदे संबंधीची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट केली. अक्षय ऊर्जेसंबधीची नवनवीन तंत्रे विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी असा संदेश त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. सदर कार्यशाळेविषयी आणि परिषदेविषयीची संपूर्ण माहिती परिषदेच्या संघटन सचिव सौ. निशा वडेर यांनी दिली आणि अक्षय ऊर्जेमधील नवनवीन व्याप्तीसंबंधीची जाणीवही नवतरुणांना दिली.

**सत्र – I**

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात सौ. छाया भोसले (प्रमुख QA & I (विद्युत) टाटा पॉवर कंपनी लि. मुंबई) यांनी 'Industrial approach towards Renewable Energy System' या विषयी विचार मांडले. त्यांनी टाटा पॉवरमध्ये अक्षय ऊर्जेची भूमिका फार महत्त्वाची असल्याचे स्पष्ट केले. शिवाय अक्षय ऊर्जा विभागात नवीन आवाहने सुद्धा उपस्थितांना सांगितली. भारतीय ऊर्जा रुपरेखा आणि नविनीकरण ऊर्जेसंबंधीची सुधारणा त्यांनी आकडेवारीसह स्पष्ट केली. अखेर त्यांनी तपशिलात जाऊन अक्षय ऊर्जा व त्या संबंधीची व्यवसायिक योजना यांचा लाभ उठविण्याचे आवाहन केले. उपस्थितांना सुद्धा सौर टॉप्स आणि या क्षेत्रातील नोकरीच्या संधी या संबंधीची माहिती मिळाली.

**सत्र – II**

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. एच. ए. मंगळवेढेकर (निवृत्त प्राध्यापक VJTI, मुंबई) यांनी 'Future Power System Scenario' संबंधी मार्गदर्शन केले. अजय ऊर्जा पद्धतीद्वारे पॉवर सिस्टीम ग्रीडच्या एकत्रीकरणाचे कार्य सांगितले आणि क्षेत्रातील तरुण अभियंत्याकडून अपेक्षा व्यक्त केल्या.

**सत्र – III**

कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात श्री. केदार आनंद नाडगौंडी (प्रमुख संचालक, लेव्हीकॉन ग्रुप) यांनी 'Career Opportunities with Solar System' विषयी माहिती दिली. सोलर पॅनलची मुलभूत माहिती, LED पद्धतीचे पथ दिवे, घरगुती दिवे इत्यादींचा त्यामध्ये समावेश होता. सौर ऊर्जा ग्रीड आणि संकल्पीत नेट मिटरींगद्वारे कशी एकत्रित केली जाते हे स्पष्ट केले. शिवाय त्यांनी चालू सौर पंप पद्धत या विषयीची माहिती सर्व उपस्थितांना करून दिली.

**प्रदर्शन सत्र**

तीन सत्रे पार पाडल्यानंतर शेवटी प्रदर्शन सत्र पार पडले. यामध्ये सर्व चालू सौर ऊर्जेवर चालणारी उत्पादने

ठेवलेली होती. त्यामध्ये सर्व प्रकारचे LED दिवे, पथपथावरील सौर दिवे, सौर ऊर्जेवर चालणारे कंदील, ऑफ ग्रीड आणि ऑन ग्रीड इनव्हर्टर, सौर पंपीण सिस्टीम इत्यादी. ही सर्व उत्पादने लेव्हीकॉन टिमकडून सर्व उपस्थितांना नवीन तंत्रज्ञानासह चालू स्थितीत पाहायला मिळाली.

वरील सर्व चालू व नवनवीन उत्पादने उपस्थितांनी पाहिली. त्यामध्ये मॉडेल लेड लॅम्प, ऑफ ग्रीड आणि ऑन ग्रीड इनव्हर्टर इत्यादींचा समावेश होता. प्रत्यक्षात सोलार पथ दिव्याचा वापर करून त्यामधील कामाच्या संधीही आत्मसात कराव्यात. शिवाय लिथियम बॅटरीजचा वापर करून विद्यार्थ्यांनी चालू सौर कंदील पाहिला. शिवाय लिथियम बॅटरीजमधील त्याचे फायदे समजून घेतले.

शेवटी टिम लेव्हीकॉन ग्रुप आणि उपस्थितांनी आपआपले शंका समाधान व्यक्त केले व सर्वांनी कार्यशाळा यशस्वी झाल्याचे समाधान व्यक्त केले.

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (MSBTE). उन्हाळी सन २०१६-१७ परीक्षेचे निकाल जाहीर**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या अभियांत्रिकी पदविका उन्हाळी सन २०१६-१७ परीक्षेचे निकाल जाहीर झाले असून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी चांगलेच यश संपादन केले आहे.

तंत्रनिकेतनमध्ये अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमानुसार नावे व गुण खालीलप्रमाणे

**प्रथम वर्ष (सत्र । + सत्र ॥)**

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | अभ्यासक्रम | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | पाठक अलोक राजेश | CH | १३२९/१५०० | ८८.६०% |
| २. | नलावडे स्नेहल गोविंद | CH | १२३६/१५०० | ८२.४०% |
| ३. | परब सिद्धांत शिरीषकुमार | CH | १०३६/१५०० | ६९.०७% |
| १. | अघा लिझा शाहीद | CO | १३३१/१४५० | ९१.७९% |
| २. | शेख तिहा कमलुद्दिन | CO | १३०९/१४५० | ९०.२८% |
| ३. | कर्नाटकी सोनाली सुधाकर | CO | १३०४/१४५० | ८९.९३% |
| १. | थोरात ऋतुजा दिगंबर | EP | १२००/१४०० | ८५.७१% |
| २. | सोना शिवानी विजय | EP | ११५९/१४०० | ८२.७९% |
| ३. | धुमाळ सुदेश चंद्रकांत | EP | ११३४/१४०० | ८१.००% |
| १. | जोशी श्रेयस सतीश | IE | १२१७/१३५० | ९०.१५% |
| २. | नेल सेबास्टिन | IE | ११७३/१३५० | ८६.८९% |
| ३. | कामत सृष्टी विवेक | IE | ११००/१३५० | ८१.४८% |
| १. | सुरभी गावडे | IF | १२८१/१४५० | ८८.३४% |
| २. | वनारे श्रिया सुनील | IF | १२३३/१४५० | ८५.०३% |
| ३. | आपटे सई रवींद्र | IF | १२१९/१४५० | ८४.०७% |

जो चांगल्या वृक्षाचा आश्रय घेतो, त्याला चांगली छाया लाभते. - इमरसन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | अधिकारी आशिष गोपाळ | IS | ११६८/१३५० | ८६.५२% |
| २. | म्हात्रे यश लवेश | IS | ११६०/१३५० | ८५.९३% |
| ३. | पाटील गौरव कमलाकर | IS | ११०३/१३५० | ८१.७०% |
| १. | राणे कृष्णा दिनेश | MU | ११७१/१३५० | ८६.७४% |
| २. | चव्हाण दर्शना सुधाकर | MU | ९९८/१३५० | ७३.९३% |
| ३. | गायकवाड अनुष्का बाळकृष्ण | MU | ९९३/१३५० | ७३.५६% |

**द्वितीय वर्ष (सत्र III + सत्र IV)**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | अभ्यासक्रम | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | नंदकिशोर गौरव मनोहर | CH | १३३०/१६५० | ८०.६१% |
| २. | मोघे अमर रवी | CH | १२६७/१६५० | ७६.७९% |
| ३. | इंगळे प्रणव जीवन | CH | १२५३/१६५० | ७५.९४% |
| १. | पाताडे प्रणव नितीन | CO | १६३६/१७५० | ९३.४९% |
| २. | शेख मोहम्मद अनझल जाफर | CO | १५३३/१७५० | ८७.६०% |
| ३. | चौधरी विवेक बापूजी | CO | १५२६/१७५० | ८७.२०% |
| १. | विशे हर्षला विजय | EP | १३७२/१७०० | ८०.७१% |
| २. | जोशी प्रिया श्रीविठ्ठल | EP | १३५६/१७०० | ७९.७६% |
| ३. | जाधव परेश नितीन | EP | १३३८/१७०० | ७८.७१% |
| १. | होडशील प्रतिज्ञा ज्ञानदेव | IE | १३७०/१६०० | ८५.६३% |
| २. | सुर्वे रिद्धी जयेंद्र | IE | १३११/१६०० | ८१.९४% |
| ३. | शेलार तन्वी नामदेव | IE | १२१३/१६०० | ७५.८१% |
| १. | जोशी हेत राकेशकुमार | IF | १६६३/१७५० | ९५.०३% |
| २. | भोईर निमिषा विद्याधर | IF | १५३२/१७५० | ८७.५४% |
| ३. | गोळे प्राजक्ता दिलीप | IF | १४९२/१७५० | ८५.२६% |
| १. | बाळू राजाराम कुंडे | IS | १२२८/१७०० | ७२.२४% |
| २. | सावंत सोहम सतीश | IS | १२१५/१७०० | ७१.४७% |
| ३. | वयाळ संदीप भिमा | IS | १२१३/१७०० | ७१.३५% |
| १. | बोरसे स्नेहल संजय | MU | १३०९/१६०० | ८१.८१% |
| २. | शहा तबासुम मोहम्मद शकील | MU | १२६५/१६०० | ७९.०६% |
| ३. | पाटील सायली राजेंद्र | MU | १२०५/१६०० | ७५.३१% |

**तृतीय वर्ष (सत्र V + सत्र VI)**

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | अभ्यासक्रम | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | विचारे साहील संजय | CH | १४४१/१६५० | ८७.३३% |
| २. | राजे मयुर मनोज | CH | १३४९/१६५० | ८१.७६% |
| ३. | मिताली शाम इलिनजे | CH | १३४१/१६५० | ८१.२७% |
| १. | यादव संयुक्ता प्रल्हाद | CO | १४०६/१६०० | ८७.८८% |
| २. | पटेल धृती सुनील | CO | १४०४/१६०० | ८७.७५% |
| ३. | कुलकर्णी वैभव राजीव | CO | १३९४/१६०० | ८७.१३% |
| १. | पालकर भक्ती चंद्रकांत | EP | १४६२/१६५० | ८८.६१% |
| २. | पगारे धम्मदीप दयानंद | EP | १४३७/१६५० | ८७.०९% |
| ३. | कुलकर्णी सायली हेमंत | EP | १४२२/१६५० | ८६.१८% |
| १. | अव्हाड कोमल संजय | IE | १५८६/१७५० | ९०.६३% |
| २. | राणे सुरज सुभाष | IE | १५८५/१७५० | ९०.५७% |
| २. | वानखेडे प्रणाली महेश | IE | १५८५/१७५० | ९०.५७% |
| ३. | कुलकर्णी प्रथमेश किरण | IE | १५६५/१७५० | ८९.४३% |
| १. | सहा अंकिता असिमकुमार | IF | १५३०/१७०० | ९०.००% |
| २. | चौगले मेहताब इक्बाल हुसेन | IF | १४८१/१७०० | ८७.१२% |
| ३. | कोरडे ऐश्वर्या युवराज | IF | १४८०/१७०० | ८७.०६% |
| १. | चव्हाण सिद्धांत संदेश | IS | १५४३/१७०० | ९०.७६% |
| २. | जोशी प्रतिभा संजय | IS | १५२७/१७०० | ८९.८२% |
| ३. | सुहेब खान | IS | १४७६/१७०० | ८६.८२% |
| १. | नार्वेकर मिनोती माधव | MU | १३५१/१६०० | ८४.४४% |
| २. | भंडारे रुपिका भागेश | MU | १३५०/१६०० | ८४.३८% |
| ३. | कोनार सिवा सुब्रमण्यम इस्साकीपन | MU | १३०९/१६०० | ८१.८१% |

वरील यशस्वी विद्यार्थ्यांचे वि.प्र.मंडळाचे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकवर्ग यांचे तर्फे अभिनंदन करण्यात आले.

•••



जे उत्तुंग आणि महान वृक्ष असतात, त्यांना विजेची भीती असते. – सी. रॉलीन

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय)**

दादाभाईंच्या प्रसिद्ध 'आर्थिक शोषण' (Drain Theory) या सिद्धान्ताची बिजं या भाषणात सापडतात. १८७६ साली त्यांनी आपले या सिद्धान्तावर विस्तृत भाष्य करणारे पुस्तक 'Poverty and Un-British Rule in India' प्रकाशित केले.

साम्राज्यावादापासून भारताला मुक्त करायचे असेल तर भारत 'स्वतंत्र' होणे आवश्यक आहे, या विचारातून संपूर्ण भारतीय स्वातंत्र्याची चळवळ, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उभी राहिली. दादाभाईंचे पुस्तक हे त्या चळवळीचे एक स्फूर्तीस्थान होते. २००२ साली बिपिनचंद्र यांनी आपल्या "Essays on Indian Nationalism" या पुस्तकामध्ये याचा तपशीलवार आढावा घेतला आहे.

१६०० ला इस्ट इंडिया कंपनी भारतात व्यापाराकरता आली. त्यांनी भारतभर वखारी स्थापन केल्या. हळूहळू स्थानिक व्यवस्थेपासून महसुलापर्यंत या कंपनीचे अधिकार प्रस्थापित व्हायला लागले. १७५७ साली प्लासीची लढाई झाली आणि बंगाल प्रांताची बहुतेक सूत्रं इस्ट इंडिया कंपनीच्या हातात गेली. याचवेळी युरोपमध्ये प्रबोधन, आणि औद्योगिक क्रांती होत होती. १६०० साली असलेल्या व्यापाराचे स्वरूप संपूर्णतः बदलले होते. बोटी भरभरून त्यावेळी कंपनी भारतातले पदार्थ इंग्लंडमध्ये नेत होती. भारताला देण्यासारखे त्यावेळी इंग्लंडकडे काहीच नव्हते. भारताची आयातीपेक्षा निर्यात जास्त होती. कंपनीला त्याकरता भारतामध्ये चांदी, सोनं या स्वरूपात देणी द्यावी लागत होती. १७७२ साली लॉर्ड क्लाइव्ह यांनी House of Commons मध्ये केलेल्या भाषणांत सांगितले,

"Silver of the West and the gold of the East have for many years been pouring into that country (Bengali) and goods only have been sent out in return".

१८५७ सालच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धानंतर इस्ट इंडिया कंपनीचे राज्य संपवून इंग्लंडच्या राणीचे राज्य चालू झाले. इस्ट इंडिया कंपनीच्या वाढत्या व्यापारामुळे आणि महसूलातील हस्तक्षेपामुळे भारताची शेती, ग्रामव्यवस्था, त्यावर आधारलेले उत्पादनाचे स्रोत, आणि अर्थातच अर्थव्यवस्था विस्कळीतच नाही तर दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन उभी राहिली. यातून निर्माण झालेली पोकळी, इंग्रजी वस्तू, आणि व्यापारातून भरुन निघत होती. दादाभाईंनी हेच आर्थिक शोषण सप्रमाण दाखवून दिले होते.

Alexander Dow हा इस्ट इंडिया कंपनीत एक सैनिकी अधिकारी होता. त्याने भारतावर बरेच लिखाण करून ठेवले आहे. १७७९ साली त्याचे भारतातच देहावसान झाले. त्यांनी या व्यापारातील आर्थिक शोषणाबद्दल लिहून ठेवले आहे. १७९० सालच्या लॉर्ड कॉर्नवॉलिस (Lord Cornwallis) यानी आपल्या टिपणीमध्येही आर्थिक शोषणाचे उल्लेख करून ठेवले आहेत. एडमंड बर्क (Edmund Borke) यानी १७८३ साली हाऊस ऑफ कॉमन्सला सादर केलेल्या टिपणीमध्ये नोंद केली आहे की,

"the country has suffered what is tantamout to an annual plunder of its manufactures and its produce to the value of twelve hundred thousand pounds".

थोडक्यात; अलेक्झांडर डोव (Alexander Dow), फिलीप्स फ्रॅन्सीस (Philips Francis), जॉन शोअर (John Shore), लॉर्ड कॉर्नवॉलीस (Lord Cornwallis), पासून एडमंड बर्कपर्यंत (Edmund Burke) सगळ्यांनी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात, इंग्रजांनी केलेल्या या आर्थिक लुटीचे तपशीलवार वर्णन, आपले अहवाल आणि हाऊस ऑफ कॉमन्सला सादर केलेल्या टिपण्यांमधून सविस्तरपणे मांडले आहे. १८३८ साली आर. एम. मार्टीन (R. M. Martin) यांनी लिहिलेल्या 'The History, Antiquities, Topography and Statistics of Eastern India' या

पुस्तकातही पुन्हा या लुटीचे विश्लेषणात्मक वर्णन केले आहे.

प्लासीच्या युद्धानंतर इंग्रजांचा अंमल हा बंगालमध्ये चालू झाल्याचे आपण बघितलेले आहे. इंग्रजी शिक्षण, छपाईमुळे उपलब्ध होणारी पुस्तके, आणि इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्समधील चर्चांची टिपणे अर्थातच कलकत्यामध्ये उपलब्ध होऊ लागली होती. 'संवाद प्रभाकर' या वृत्तपत्राचे संपादक ईश्वरचंद्र गुप्ता, 'सोमप्रकाश' या साप्ताहिकाचे संपादक द्वारकानाथ विद्याभूषण, बकिमचंद्र चट्टोपाध्याय, भूदेव मुखोपाध्याय, सखाराम गणेश देऊसकर आणि खुद्द रवींद्रनाथ टागोर या बंगालमधल्या विचारवंतांनी त्यावेळी ब्रिटिशांनी केलेल्या या आर्थिक लुटीचा भरपूर समाचार आपल्या लिखाणातून घेतला आहे. १९०१ च्या सुमाराला लिहिलेले, The Economic History of India Under Early British Rule (from the rise of the British Power in 1757 to the accession of Queen Victoria in 1837) हे रमेश दत्त यांनी लिहिलेले पुस्तक हे औद्योगिकीकरण, इंग्रजांची आर्थिक धोरणं यामुळे भारताच्या झालेल्या आर्थिक शोषणावरती लिहिले गेलेले असामान्य पुस्तक आहे. १८७६ साली लिहिलेल्या दादाभाई नौरोजीनंतर, रमेश दत्त यांनी लिहिलेल्या पुस्तकामुळे भारताला स्वातंत्र्य का हवे? या विचाराला सप्रमाण पुष्टी मिळाली होती.

कलकत्त्याप्रमाणेच मुंबई-पुण्यामध्येही नवीन इंग्रजी शिक्षितांची पिढी १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात तयार होत होती. इंग्लंडमधील उदारमतवाल्यांचं लिखाण, व ख्रिस्तिधर्मप्रसारकांनी हिंदूधर्मातील दाखवलेली वैगुण्यं ही प्रमाण धरून, मराठीतील या विचारवंतांची पिढी वाटचाल करत होती.

''हिंदुस्थानची प्राचीन वा सांप्रतची स्थिती वा पुढे काय त्याचा परिणाम होणार या विषयी विचार.''

असा लांबलचक शिर्षक असलेला मराठीमधील पहिला अर्थशास्त्रावरचा ग्रंथ रामकृष्ण विश्वनाथ यांनी १८४३ साली लिहिला. लोकहितवादी म्हणजे गोपाळ हरी देशमुख यांनी 'लक्ष्मीज्ञान' हा ग्रंथ १८४९ साली लिहिला. विल्यम क्लिफ्ट (William Clift) यांच्या इंग्रजी ग्रंथाचे हे भाषांतर आहे. हरी केशवजी, आणि विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी श्रीमती मर्सेट (Mrs. Mercet) यांच्या 'Conversations on Political Economy' या इंग्रजी ग्रंथाचे भाषांतर १८५४ साली 'देशव्यवहार व्यवस्था या शास्त्राची मूलतत्त्वे' या शीर्षकाखाली प्रकाशित केले. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीही जॉन स्टुअर्ट मिल (John Stuart Mill) याच्याच ग्रंथाचे भाषांतर 'अर्थशास्त्र परिभाषा' या शीर्षकाखाली केले. या सगळ्या ग्रंथांमधून इंग्रजी अंमलामुळे झालेल्या आर्थिक शोषणाची थोडीफार माहिती असली तरी, प्रामुख्याने रामकृष्ण विश्वनाथ यांचा अपवाद वगळता, ती भाषांतरीत आणि सामाजिक वैगुण्यांचा ऊहापोह आणि त्यामधून करायच्या सुधारणा यांचा ऊहापोह करणारी आहे.

डी. के. बेडेकर यांनी १९६६ मध्ये पुण्याच्या गोखले अर्थशास्त्रीय संस्थेमधून, 'चार जुने अर्थशास्त्रीय ग्रंथ' या शीर्षकाखाली हे सर्व लिखाण आपल्या टिपणीसकट प्रकाशित केले आहे. इंग्रजी अंमलामुळे भारतीय समाजव्यवस्थेचे झालेले नुकसान आणि आर्थिक शोषण या संदर्भातील बंगाली विचारवंतांचे लेखन जास्त भेदक आणि वस्तुस्थितीदर्शक आहे. आज या सगळ्याच विषयावर, वेगळे ग्रंथालय काढावे लागेल एवढे संशोधन साहित्य उपलब्ध आहे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणारे गोपाळ कृष्ण गोखले, महादेव गोविंद रानडे, विष्णूशास्त्री चिपळूणकर, बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांच्या अर्थविषयक, समाजसुधारणा, आणि संपूर्ण स्वातंत्र्याच्या विचारांची बैठक ही या पूर्वसुरींच्या लिखाणांनी प्रभावित झाली होती.

आज स्वातंत्र्य मिळून आपल्याला ७० वर्षे होऊन गेली. इंग्रजांच्या वसाहतवादानी, आपल्या इंग्रज नोकरांना आवाच्यासवा पगार, त्यांचे रहाणीमान आणि जीवनशैलीवरती बेसुमार खर्च, पोलाद, यंत्रसामुग्री आणि तंत्रज्ञानाची भरमसाठ किंमती देऊन भारतात केलेली आयात इ. माध्यमातून ही लुटमार केली होती. भारतीय रेल्वेच्या निर्मितीकरता एक किलोमीटरच्या मार्गाला इंग्लंड किंवा कॅनडामध्ये जेवढा खर्च येईल, त्याच्या दुप्पट किंवा तिप्पट खर्च करून तो पैसा इंग्लंडला पाठवण्यात येत होता. भारतातील रेल्वे ही इंग्लंडमध्ये खाजगी भांडवल उभे करून बांधली गेली होती.

इंग्लंडच्या सरकारप्रमाणेच, भारतीय पगार आणि व्यापारावर गब्बर झालेले इंग्रज, इंग्लडमध्ये विलासी आणि ऐषारामाचे जीवन जगत होते. भारतामधील राजांच्या अशाच विलासी जीवनाचा त्यांच्यासमोर आदर्श होता. इंग्लंडमध्ये अशा विलासी जीवन जगणाऱ्या व्यक्तिंना 'नवाब' म्हणून संबोधण्यात येई. 'लूट' आणि 'नवाब' हे दोन शब्द इंग्रजी भाषेने भारताकडून घेतले. अर्थातच शब्दांबरोबरच त्यामागील अर्थाचेही त्यांनी तंतोतंत पालन केले.

ही 'लूट' आणि 'नवाबी'करणातून सुटका मिळवण्याकरता आपल्याला 'स्वातंत्र्य' पाहिजे होते. अर्थातच या गोष्टींच्या पुनरावृत्तीची स्वातंत्र्यानंतर अपेक्षा नव्हती. १९४७ ला आपण स्वतंत्र झालो आणि १९५० ला आपल्या घटनेच्या माध्यमातून लोकशाही प्रस्थापित झाली. आता आपला राज्यकारभार आपण आपल्या लोकप्रतिनिधींतर्फे चालवतो. सर्वात मोठी क्लेषकारक गोष्ट ही आहे की, वसाहतवाद्यांनी आर्थिक लुटमारीकरता जे स्रोत वापरले तेच स्रोत वापरून आज आपले लोकप्रतिनिधी स्वतंत्र भारतातील नागरिकांची लूट करत आहेत. निवडून आल्यावर काही वर्षांतच त्यांनी केलेली 'माया' बघून स्तंभीत व्हायला होते. ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत ही 'लूट', परंपरा अव्याहतपणे चालू आहे. यावर आधारित एक नवीन राजकीय संस्कृती निर्माण झाली आहे.

इंग्रजांना माहीत नव्हते असे अनेक नवीन 'स्रोत' स्वतंत्र भारतातील राजकीय संस्कृतीने निर्माण केले आहेत. दिल्लीपासून गल्लीपर्यंत निवडून आलेल्या लोकप्रतिधींमध्ये २०% ते ३०% लोकप्रतिनिधींवर अपहरण, मारामाऱ्या ते बलात्कारापर्यंत गुन्हे दाखल आहेत. आयकरापासून, सभ्यसमाजावर असलेल्या निर्बंधांचे पालन होतांना यांच्याकडून दिसत नाही. वसाहतवाद्यांना लाजवतील असे व्यवहार यांच्याकडून होताना आज आपण अनुभवत आहोत. भारतातल्या राजकारणाची दिशा, आणि दशा आज भयावय आहे. घराणेशाही, आणि व्यक्ती महात्म्यानीं ती आज बरबटलेली आहे. वसाहतवाद्यांनी केलेली लूट 'ढेंगू' वाटावी असे 'नवाब' ७० वर्षांत आपण स्वतंत्र भारतात निर्माण केले आहेत.

साहजिकच स्वातंत्र्यानंतर आज ७० वर्षांनंतरही जागतिक व्यापार, अर्थव्यवहार आणि संशोधनामध्ये भारताचे योगदान अत्यल्पच आहे. बाबांची भोंदूगिरी, उत्सवांचे बकालीकरण आणि ढोल-ताश्यांच्या गोंगाटाच्या बाबतीत मात्र जगातला कुठलाच देश आपली बरोबरी करू शकणार नाही. चीड आणणारी गोष्ट म्हणजे या सगळ्याला असलेला राजकारण्यांचा पाठिंबा!!!

इंग्रज आज भारतातून निघून गेले असले तरी 'वसाहतवादी' मानसिकता, आणि त्यातून निर्माण होणारी 'लूट' यातून आपली सुटका अजून झालेली नाही. या लुटीपासून स्वातंत्र्य मिळवण्याकरता, आता एका नव्या स्वातंत्र्य लढ्याची उभारणी करण्याची गरज अपरिहार्य होऊन बसली आहे यात आता शंका नाही.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**



# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.